पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

14 वर्ष वर्धापन दिन

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३४२ ■ रविवार, दि.२१ जून २०२६ ■ मूल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/ 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# विठुरायाच्या भेटीसाठी लालपरी सज्ज !

प्रतिनिधी २१ जून

## ♦ आषाढी एकादशी यात्रेसाठी एसटीच्या ५,५०० विशेष बस

**मंबई** : 'ज्ञानोबा-तुकाराम' च्या जयघोषात आणि 'विठ्ठल... विठ्ठल..'च्या अखंड नामस्मरणात पंढरपूरच्या दिशेने निघालेल्या लाखो वारकऱ्यांच्या सेवेसाठी महाराष्ट्राची जीवनवाहिनी असलेली एसटी यंदाही सज्ज झाली आहे. आषाढी एकादशी यात्रेनिमित्त राज्यभरातून श्रीक्षेत्र पंढरपूरकडे जाणाऱ्या भाविकांच्या सुरक्षित, सुलभ आणि सुखकर प्रवासासाठी ५ हजार ५०० विशेष बसेस सोडण्याचे नियोजन करण्यात आले असून, राज्यातील कोणत्याही गावातून ४० किंवा त्यापेक्षा अधिक भाविकांनी एकत्रित मागणी केल्यास त्या गावातून थेट पंढरपूरसाठी विशेष एसटी बस उपलब्ध करून दिली जाणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.



आषाढी यात्रेदरम्यान लाखो वारकरी पालख्यांसह पायी, रेल्वेने, खासगी वाहनांनी आणि एसटीने पंढरपूरकडे प्रस्थान करतात. या भाविकांच्या सेवेला सर्वोच्च प्राधान्य देत एसटी महामंडळाने व्यापक नियोजन केले आहे. भाविकांनी आपल्या जवळच्या एसटी आगाराशी संपर्क साधून विशेष बसची नोंदणी करावी, असे आवाहनही करण्यात आले आहे. विशेष म्हणजे या विशेष बस सेवेतही शासनाच्या सर्व प्रवासी सवलती कायम राहणार आहेत. ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना 'अमृत ज्येष्ठ नागरिक योजना' अंतर्गत मोफत प्रवास, तर महिलांना 'महिला सन्मान योजना' अंतर्गत तिकीट दरात ५० टक्के सवलत दिली जाणार आहे. त्यामुळे विठुरायाच्या दर्शनाचा प्रवास अधिक किफायतशीर आणि सुलभ होणार आहे. मागील वर्षी आषाढी यात्रेसाठी एसटीने ५,२०० विशेष बसेस चालवून तब्बल २१ लाख २५ हजार भाविकांची सुरक्षित ने-आण केली होती. यंदा त्याहून अधिक सक्षम नियोजन करण्यात आले आहे.

### पंढरपुरात चार तात्पुरती बस स्थानके

भाविकांची गर्दी लक्षात घेऊन पंढरपूर येथे चंद्रभागा, भीमा (देगाव), विठ्ठल कारखाना आणि पांडुरंग (आयटीआय महाविद्यालय) अशी चार तात्पुरती बस स्थानके उभारण्यात येणार आहेत. या स्थानकांवर पिण्याचे पाणी, सुलभशौचालय, संगणकीय आरक्षण केंद्र, चौकशी कक्ष, मार्गदर्शन फलक आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

# नीट परीक्षा आज ; अकोल्यात सुरक्षेचा 'चक्रव्यूह'

## ♦ साडेसहा हजार विद्यार्थी परीक्षा देणार !



प्रतिनिधी २१ जून

**अकोला** : देशभरात पेपरफुटी आणि परीक्षांमधील घोटाळ्यांवरून आधीच वातावरण तापलेले असताना, आज रविवारी २१ जून रोजी होणाऱ्या 'नीट' परीक्षेसाठी जिल्हा आणि पोलीस प्रशासन पूर्णपणे 'अ?क्शन मोड'मध्ये आले आहे. अकोला आणि मूर्तिजापूरमधील १७ परीक्षा केंद्रांवर प्रशासनाने सुरक्षेचा प्रचंड मोठा चक्रव्यूह रचला असून कडक बंदोबस्तात आज दुपारी या परीक्षेला सुरुवात होत आहे.

राष्ट्रीय परीक्षा एजन्सीमार्फत घेण्यात येणाऱ्या या परीक्षेसाठी जिल्ह्यातील सतरा परीक्षा केंद्रांवर ६,५३८ परीक्षार्थी बसले आहेत. आज सकाळपासूनच विविध परीक्षा केंद्रांवर विद्यार्थ्यांची आणि पालकांची मोठी हजेरी पाहायला मिळाली. देशभरातील एकूण परिस्थिती पाहता आज विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर कमालीचा तणाव स्पष्टपणे दिसून येत आहे.

परीक्षा केंद्राच्या आसपास गैरप्रकार किंवा कायदा सुव्यवस्थेला बाधा आणण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना प्रशासनाने स्पष्ट आणि थेट इशारा दिला आहे की— 'कायद्यात राहाल तर फायद्यात राहाल!' आज दुपारी २ ते सायंकाळी ६:१५ या वेळेत अकोला आणि मूर्तिजापूर शहरांतील १७ केंद्रांवर ही परीक्षा पार पडत आहे. परीक्षेचे गोपनीय पेपर केंद्रांवर सुरक्षित पोहोचवण्यासाठी पोलीस प्रशासनाने विशेष बंदोबस्त तैनात केला होता. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून संवेदनशील भागांवर आणि परीक्षा केंद्रांवर पोलिसांची करडी नजर आहे. परीक्षा प्रक्रियेशी थेट संबंध नसलेल्या कोणत्याही बाहेरील व्यक्तीला, अगदी प्रसारमाध्यमांनाही परीक्षा केंद्राच्या आवारात प्रवेश करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर थेट कायदेशीर कारवाईचा बडगा उगारला जाईल, असा सज्जड दम प्रशासनाने दिला आहे.

# आयुक्तांच्या बंगल्यावर बड्या ठेकेदारांची धावाधाव

प्रतिनिधी २१ जून

## ♦ कचऱ्याच्या कोट्यावधीच्या ठेक्यासाठी हालचाली

**अकोला** : अकोला महानगरपालिकेत सध्या कचरा संकलनाच्या कोट्यवधींच्या ठेक्यावरून प्रचंड 'लपवाछपवी' सुरू असल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. एकीकडे शहरात कचऱ्याची कोंडी निर्माण झाली असताना, दुसरीकडे मात्र नागपूरच्या एका 'लाडक्या' कंत्राटदाराला ठेका मिळवून देण्यासाठी मनपाच्या काही बड्या अधिकाऱ्यांनी रात्रीचा दिवस केला आहे. विशेष म्हणजे, आयुक्त सध्या सुट्टीवर असतानाही त्यांच्या शासकीय बंगल्यावर अधिकारी आणि कंत्राटदारांचे 'अर्थपूर्ण' गुऱ्हाळ रंगत असल्याने अकोल्याच्या राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात तीव्र खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या खात्रीलायक माहितीनुसार, अकोला मनपाच्या कचरा ठेक्याची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली असून मंगळवारपर्यंत हा कोट्यावधीचा ठेका फायनल होण्याची शक्यता आहे. मात्र, हा निर्णय होण्यापूर्वीच प्रशासकीय पातळीवर प्रचंड गुप्त हालचालींना वेग आला आहे. आयुक्त सुट्टीवर असतानाही त्यांच्या बंगल्याचे दरवाजे कोणासाठी उघडले गेले ? तिथे कोणासाठी पायघड्या घातल्या गेल्या ? आणि आयुक्तांच्या अनुपस्थितीत या बंगल्याला चर्चेचा अड्डा कोणी बनवला ? असे अनेक गंभीर प्रश्न आता उपस्थित केले जात आहेत. अकोल्यातील एका हॉटेल मध्ये उतरलेल्या या नागपूरच्या ठेकेदाराने सकाळी अधिकाऱ्यांशी चर्चा केल्याची माहिती आहे.अधिकाऱ्यांना हाताशी धरून फिल्डिंग लावणारा तो नागपूरचा बडा कंत्राटदार नेमका कोण? याची उत्सुकता आता शिगेला पोहोचली आहे. या संपूर्ण प्रकरणातील कोट्यवधींच्या 'लपवाछपवी'मुळे पारदर्शकतेचा पुरता बोजवारा उडाला असून, मंगळवारी होणाऱ्या निविदा अंतिम प्रक्रियेकडे आता सर्वांचे डोळे लागले आहेत.

### मुंबईचे ठेकेदार राहिले गाफिल

◆या कोट्यवधींच्या संयुक्त ठेक्यासाठी मुंबईच्या नामांकित कंपन्यांनीही रस दाखवला होता. मात्र, या कंपन्यांना पूर्णपणे गाफील ठेवून, नागपूरच्या एका विशिष्ट कंत्राटदाराला 'धोबीपछाड' देण्यासाठी मनपाच्या अधिकाऱ्यांनी पडद्यामागून जोरदार सूत्रे हलवली आहेत. नागपूरच्या या 'खास मित्रासाठी' अधिकाऱ्यांनी इतकी चोख तयारी केली आहे की, हा ठेका आधीच 'फिक्स' झाल्याची चर्चा आता उघडपणे रंगू लागली आहे.

# दोन दिवसांत राज्यात पावसाची शक्यता !

प्रतिनिधी २१ जून

**मुंबई** : भारतीय हवामान विभागाने सलग दुसऱ्या दिवशी महाराष्ट्रातील रेंगाळलेले मान्सून आगमन २३ जूनपासून होऊ शकते, असे जाहीर केल्याने आता मंगळवारकडे नागरिकांच्या नजरा लागल्या आहेत. मान्सूनच्या पुढच्या प्रवासासाठी पुन्हा एकदा अनुकूल स्थिती निर्माण होत आहे. प्रादेशिक हवामान विभागाने सोमवारपासून मुंबई, ठाणे येथे मेघगर्जनेसह पावसाचा 'यलो अलर्ट' दिला आहे. त्यामुळे उकाड्यापासून दिलासा मिळणार आहे.






सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा

रविवार दि. २१ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## आपण आंतरराष्ट्रीय दिवस का साजरे करतो?

आंतरराष्ट्रीय दिवस आणि आठवडे हे जनतेला महत्त्वाच्या विषयांवर शिक्षित करण्याचे, जागतिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती आणि संसाधने एकत्रित करण्याचे, तसेच मानवतेच्या कर्तृत्वाचा गौरव करून त्याला बळकटी देण्याचे प्रसंग आहेत. आंतरराष्ट्रीय दिवसांचे अस्तित्व संयुक्त राष्ट्रांच्या स्थापनेपूर्वीपासून आहे, परंतु संयुक्त राष्ट्रांनी त्यांना एक शक्तिशाली समर्थन साधन म्हणून स्वीकारले आहे. आपण संयुक्त राष्ट्रांचे इतर विशेष दिवसही साजरे करतो .




आज जागतिक योग दिन

# योग : भारतात उगम पावलेली शारीरिक, मानसिक अन् अध्यात्मिक साधना !

योग ही भारतात उगम पावलेली एक प्राचीन शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक साधना आहे. 'योग' हा शब्द संस्कृतमधून आला असून त्याचा अर्थ जोडणे किंवा एकत्र करणे असा आहे, जो शरीर आणि चेतना यांच्या एकीकरणाचे प्रतीक आहे. आज जगभरात याचा विविध स्वरूपांत सराव केला जातो आणि त्याची लोकप्रियता वाढतच आहे. त्याचे वैश्विक आकर्षण ओळखून, संयुक्त राष्ट्रांनी ११ डिसेंबर २०१४ रोजी ठराव ६९/१३१ द्वारे २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित केला. जागतिक योग दिनाचा उद्देश योगाभ्यासाच्या अनेक फायद्यांविषयी जगभरात जागरूकता निर्माण करणे हा आहे.

आंतरराष्ट्रीय योग दिनाची स्थापना करणारा ठरावाचा मसुदा भारताने मांडला होता आणि त्याला विक्रमी १७५ सदस्य राष्ट्रांनी पाठिंबा दिला. हा प्रस्ताव सर्वप्रथम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आमसभेच्या ६९व्या अधिवेशनाच्या उद्घाटनप्रसंगी आपल्या भाषणात मांडला होता, ज्यात ते म्हणाले, 'योग ही आपल्या प्राचीन परंपरेची एक अमूल्य देणगी आहे. योग मन आणि शरीर, विचार आणि कृती यांच्या एकतेचे प्रतीक आहे... हा एक समग्र दृष्टिकोन आहे जो आपल्या आरोग्यासाठी आणि कल्याणासाठी मौल्यवान आहे. योग म्हणजे केवळ व्यायाम नाही; तर तो स्वतःशी, जगाशी आणि निसर्गाशी एकरूप होण्याची भावना अनुभवण्याचा एक मार्ग आहे.' ठरावात असे नमूद केले आहे की, 'व्यक्ती आणि लोकसंख्येने अधिक आरोग्यदायी पर्याय निवडणे आणि उत्तम आरोग्यास चालना देणाऱ्या जीवनशैलीचे पालन करणे महत्त्वाचे आहे.'


या संदर्भात, जागतिक आरोग्य संघटनेने देखील आपल्या सदस्य राष्ट्रांना आवाहन केले आहे की, त्यांनी आपल्या नागरिकांमधील शारीरिक निष्क्रियता कमी करण्यास मदत करावी. ही निष्क्रियता जगभरातील मृत्यूच्या शीर्ष दहा प्रमुख कारणांपैकी एक आहे आणि हृदयविकार, कर्करोग व मधुमेह यांसारख्या असंसर्गजन्य रोगांसाठी एक प्रमुख धोकादायक घटक आहे. पण योग हा केवळ एक शारीरिक व्यायाम नाही. त्याचे एक प्रसिद्ध अभ्यासक, दिवंगत बी. के. एस. अय्यंगार यांच्या शब्दांत, 'योग दैनंदिन जीवनात संतुलित वृत्ती राखण्याचे मार्ग विकसित करतो आणि आपली कर्मे पार पाडण्याचे कौशल्य प्रदान करतो.' २०१६ मध्ये योगाचा मानवतेच्या अमूर्त सांस्कृतिक वारशाच्या प्रातिनिधिक यादीत समावेश करण्यात आला. योगाच्या या प्राचीन भारतीय अभ्यासामागील तत्त्वज्ञानाने भारतातील समाजाच्या कार्यपद्धतीच्या विविध पैलूंवर प्रभाव टाकला आहे, मग ते आरोग्य आणि वैद्यकशास्त्र असो किंवा शिक्षण आणि कला असो. मन, शरीर आणि आत्मा यांना एकरूप करून उत्तम मानसिक, आध्यात्मिक आणि शारीरिक कल्याण साधण्याच्या तत्त्वावर आधारित, योगाची मूल्ये या समाजाच्या नीतिमत्तेचा एक प्रमुख भाग आहेत.

### २०२६ ची संकल्पना : निरोगी वृद्धत्वासाठी योग

या वर्षी १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिन ' निरोगी वृद्धत्वासाठी योग ' या संकल्पनेसह साजरा होत आहे , जो सर्व वयोगटांसाठी योगाचे महत्त्व अधोरेखित करतो . निरोगी वृद्धत्वासाठी योग हा एक मौल्यवान सराव ठरू शकतो, कारण तो अशा अनेक क्षमतांना आधार देतो, ज्या लोकांना वाढत्या वयात सक्रिय, स्वतंत्र आणि व्यस्त राहण्यास मदत करतात. सौम्य हालचाल, स्ट्रेचिंग, श्वासोच्छ्वासाचे व्यायाम आणि सजगता यांचा मेळ घालून, योग संतुलन, लवचिकता, ताकद आणि हालचालक्षमता सुधारण्यास मदत करू शकतो, तसेच मानसिक आरोग्य आणि तणाव व्यवस्थापनास देखील साहाय्य करतो. योग वेगवेगळ्या शारीरिक क्षमता आणि आरोग्य स्थितीनुसार जुळवून घेता येत असल्यामुळे, अनेक ज्येष्ठ नागरिकांना त्यांचे शारीरिक आणि भावनिक आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी हा एक सुलभ मार्ग उपलब्ध करून देतो. हे फायदे जागतिक आरोग्य संघटनेच्या निरोगी वृद्धत्व दशकाच्या (२०२१-२०३०) अनेक उद्दिष्टांना साहाय्य करतात, ज्यात स्वातंत्र्याला प्रोत्साहन देणे, पडण्याचा धोका कमी करणे, जीवनाचा दर्जा वाढवणे आणि आरोग्य व कल्याणासाठी व्यक्ती-केंद्रित दृष्टिकोनास प्रोत्साहित करणे यांचा समावेश आहे.

### जागतिक आरोग्य संघटनेचे योगासाठी मोबाईल ॲप

जागतिक आरोग्य संघटनेने भारत सरकारच्या सहकार्याने, लोकांना सक्रिय आणि निरोगी राहण्यास मदत करण्यासाठी 'डब्ल्यूएचओ एमयोगा' नावाचे योग अ?प सुरू केले आहे. या ॲपमध्ये योग साधना शिकवण्यासाठी आणि त्यासोबत वापरण्यासाठी व्हिडिओ आणि ऑडिओ फाइल्सचा संग्रह आहे. जे लोक पहिल्यांदा योग करण्याचा प्रयत्न करत आहेत आणि जे आधीपासून नियमितपणे योग करतात, अशा दोघांसाठीही हे एक वापरण्यास सोपे आणि विनामूल्य साधन आहे. हे ॲप जागतिक आरोग्य संघटना आणि आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघ यांच्या संयुक्त उपक्रम असलेल्या 'बीहेल्दी बीमोबाइल' द्वारे विकसित केले गेले आहे .



# स्त्रीचा सन्मान हा सुसंस्कृत समाजाचा खरा पाया

स्त्री ही केवळ एक व्यक्ती नाही, तर कुटुंब, संस्कृती, संस्कार आणि समाजाचा आधारस्तंभ आहे. तिच्या सन्मानातच समाजाची खरी ओळख दडलेली असते. ज्या समाजात महिलांना आदर, सुरक्षितता आणि समानतेची वागणूक दिली जाते, तो समाज प्रगतीच्या दिशेने वाटचाल करतो.

स्त्री ही जन्मदात्री आहे, संस्कारांची शिदोरी आहे आणि प्रत्येक यशस्वी कुटुंबामागची प्रेरणाशक्ती आहे. आई, बहीण, पत्नी, मुलगी किंवा मैत्रीण अशा अनेक भूमिका ती आयुष्यभर निस्वार्थपणे पार पाडत असते. स्वतःच्या इच्छा आणि स्वप्नांना बाजूला ठेवून कुटुंबाच्या सुखासाठी झटणारी स्त्री ही समाजाची खरी ताकद आहे.

परंतु आजही अनेक ठिकाणी महिलांकडे दुय्यम दर्जाने पाहिले जाते. त्यांचा सन्मान, भावना आणि स्वातंत्र्य यांना किंमत दिली जात नाही. शब्दांनी, कृतींनी किंवा वर्तनातून होणारा अपमान हा केवळ एका महिलेचा अपमान नसून संपूर्ण समाजाच्या संस्कृतीवर प्रश्नचिन्ह उभे करणारा प्रकार आहे.

स्त्रीचा सन्मान म्हणजे केवळ तिचे रक्षण करणे नव्हे, तर तिच्या विचारांचा आदर करणे, तिच्या निर्णयांना महत्त्व देणे आणि तिच्या व्यक्तिमत्त्वाला समानतेची वागणूक देणे होय. महिलांना दया किंवा सहानुभूतीची गरज नसून सन्मान, विश्वास आणि समान संधींची आवश्यकता आहे.

आज महिलांनी शिक्षण, विज्ञान, क्रीडा, प्रशासन, उद्योग, राजकारण आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. प्रत्येक क्षेत्रात त्या पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहेत. त्यामुळे महिलांना कमकुवत समजण्याची मानसिकता आता बदलण्याची गरज आहे.

समाजाने महिलांकडे आदराने पाहण्याची संस्कृती रुजवली पाहिजे. घरात मुलांना लहानपणापासूनच स्त्री सन्मानाचे संस्कार दिले गेले पाहिजेत. महिलांविषयी आदराची भावना निर्माण झाली तर भविष्यात अनेक सामाजिक समस्या आपोआप कमी होतील. स्त्रीवर अन्याय होताना गप्प राहणे हेही अन्यायाला पाठबळ देण्यासारखेच आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने महिलांच्या सन्मानासाठी उभे राहिले पाहिजे. स्त्रीच्या डोळ्यात अश्रू आणणारा नव्हे, तर तिच्या चेहऱ्यावर आत्मविश्वास आणि सुरक्षिततेचे हास्य फुलवणारा समाज निर्माण करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.एक सुसंस्कृत समाज तोच, जिथे महिलांना भीती नव्हे तर विश्वास मिळतो, अपमान नव्हे तर सन्मान मिळतो, आणि बंधने नव्हे तर समान संधी मिळतात. स्त्रीचा सन्मान हा कोणत्याही एका दिवसापुरता मर्यादित नसून तो प्रत्येक दिवसाच्या आचरणात दिसला पाहिजे. कारण स्त्रीचा सन्मान जपणारा समाजच खऱ्या अर्थाने प्रगत, संवेदनशील आणि आदर्श समाज ठरतो.



नेहा पाटील
अँकर अँड रिपोर्टर
आर आर सी न्यूज अकोला

# चिमुकली मतदारच नाही तर लाडकी बहिण होणार कशी...?



मध्यप्रदेशातील इंदूर येथे राहणारी तीन वर्षाची अनिका नावाची चिमुकली मुलगी अत्यंत गंभीर आजाराचा सामना करत मृत्यूशी झुंज देत आहे. तिला महागड्या नऊ कोटीच्या इंजेक्शनची गरज असून त्यामुळे तिचा जीव वाचू शकतो. मात्र तिच्या पालकांकडे हे महागडे इंजेक्शन खरेदी करण्यासाठी पैसे नाहीत. त्यामुळे मुलीच्या उपचारासाठी सरकारने मदत करावी यासाठी उच्च न्यायालयात एक याचिका दाखल करण्यात आली होती. उच्च न्यायालयात या याचिकेवर १६ जून, २०२६ रोजी सुनावणी सुरू असतांना अनिकाची बाजू मांडणाऱ्या वकिलांनी अत्यंत भावुक पण महत्त्वाचा तर्क मांडतांना सांगितले की, राज्यात लाडकी बहिण योजना सुरू आहे. या योजनेतून गरीब, गरजू महिलांना महिन्याकाठी आर्थिक मदत दिली जाते. प्रत्येक लाभार्थी महिलेला मिळणाऱ्या आर्थिक मदतीतून फक्त दोन रुपये वजा केले तरी अनिकाच्या उपचारासाठी आवश्यक असलेले नऊ कोटी रुपये सहज उभे होऊ शकतात. वकिलांचा हा युक्तिवाद ऐकून न्यायालयानं राज्य सरकारला 'ही मुलगी राज्याची लाडकी बहिण नाही का?' असा थेट सवाल करत सरकारची खरडपट्टी काढली. सदर प्रकरणात न्यायालयाने दाखविलेल्या संवेदनशीलतेबद्दल मा. न्यायमूर्तींचे हार्दिक अभिनंदन.

अनेक राज्यात निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर केवळ महिलांची मते आपल्या पक्षाला मिळावी या हेतूने पूर्णतः राजकीय स्वार्थासाठी सुरू केलेली योजना म्हणजे लाडकी बहिण योजना होय. त्यामुळे या योजनेत दूरदृष्टी, संवेदनशीलता व महिलांचा आर्थिक विकास करण्याचा कोणताही प्रामाणिक प्रयत्न असल्याचे दिसत नाही. म्हणजे ही योजना महिला मतदारांना प्रलोभन देऊन त्यांची मते विकत घेण्याचा तो एक कपटी डाव आहे. त्यामुळे गंभीर आजाराने ग्रस्त असलेली पण मतदार नसलेली तीन वर्षाची चिमुकली अनिका सरकारसाठी लाडकी बहिण कशी होणार ? हा खरा प्रश्न आहे. महाराष्ट्रात २०२४ च्या विधानसभांच्या निवडणुकीच्या तोंडावर महायुती सरकारने मोठ्या घाईघाईने आचारसंहिता लागू होण्यापूर्वी निर्णय घेऊन लाडकी बहिण योजना सुरू केली आहे. त्यासाठी आर्थिक तरतूद करून महिलांना अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले होते. महिलांनी या योजनेतून विनाकष्ट मिळणाऱ्या पैशासाठी प्रचंड प्रमाणात प्रतिसाद दिला. त्याचा फायदा युती सरकारला सत्ता मिळविण्यासाठी झाला. मात्र निवडणुका संपल्यानंतर सरकारी तिजोरीवर प्रचंड भार पडल्यामुळे या योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांचे अर्ज तपासण्यात आले असता या योजनेचा फार मोठा गैरफायदा घेण्यात आल्याचे आणि प्रचंड भ्रष्टाचार झाल्याचे उघड झाले. विशेष म्हणजे पुरुषांनीही या योजनेत हात धुवून घेतल्याची बाबही समोर आली. तेव्हा कुठे सरकारने योजनेच्या लाभासाठी अटी व नियम निश्चित केले आणि नियमात न बसणाऱ्या महिलांना अपात्र ठरविणे सुरू करून आवश्यक कागदपत्र व केवायसी न केल्यामुळे लाखो महिलांना या योजनेतून बाद केले. यावरून ही योजना विचारपूर्वक व महिलांचा खऱ्या अर्थाने आर्थिक विकास साध्य करण्यासाठी सुरू केली नसून केवळ महिलांचे मतदान मिळविण्यासाठी सुरू केली होती हेच सिद्ध होते. या योजनेमुळे सरकारी तिजोरीवर प्रचंड भार पडला असून त्यामुळे अनुसूचित जाती जमाती व इतर मागासवर्गीय समाजाच्या हितासाठी सुरू असलेल्या योजनांचा निधी बेकायदेशीरपणे या योजनेसाठी वापरला जात आहे, ही सरकारची कृती निंदनीय व असंवैधानिक आहे. लाडकी बहिण योजना ही जरी महिलांना आर्थिक मदत करणारी योजना वाटत असली तरी या योजनेतून महिलांना फुकट व बिनकामाचे पैसे मिळतात. त्यामुळे या योजनेतून महिला पूर्णतः सक्षम व आत्मनिर्भर होऊ शकतात काय? हा चिंतनाचा विषय आहे. वास्तविक पाहता कोणतीही योजना ज्या घटकांसाठी सुरू केलेली असेल त्या घटकांची उद्यमशीलता व आत्मनिर्भर होण्याची क्षमता वृद्धिंगत करणारी असली पाहिजे. त्या योजनेच्या माध्यमातून त्यांच्यात कार्यकुशलता वाढवून त्यांना कार्यक्षम बनविले पाहिजे. मात्र लाडकी बहिण योजना ही महिलांना परावलंबी बनविणारी असून त्यांच्यातील कार्यप्रवृत्तीला मारक आहे. म्हणून अशा योजनांचा शासनाने पुनर्विचार करावा याबाबत न्यायव्यवस्थेने शासनाला अवगत करणे गरजेचे आहे.

### न्यायव्यवस्थेची सक्रियता आणि संवेदनशीलता गरजेची :

अलिकडे राजकारण एक धंदा झाला असून सत्तेसाठी साम, दाम, दंड व भेद नीतीचा मोठ्या प्रमाणात वापर वाढला आहे. त्यामुळेच तर पैशाच्या लोभापायी किंवा स्वार्थासाठी किंवा ईडी व सीबीआयच्या भीतीपोटी अनेक आमदार खासदार पक्ष सोडून सत्ताधारी पक्षात सामील होत आहेत. त्यामुळे संवैधानिक लोकशाहीची पायमल्ली होत असून मतदारांच्या मतांना कवडीचीही किंमत उरली नाही. लोकांनी ज्या पक्षाच्या उमेदवाराला निवडून दिले ते उमेदवार पक्ष सोडून दुसरा गट स्थापन करत आहेत किंवा सत्ताधारी पक्षात सामील होत आहेत. मात्र निवडणूक आयोग किंवा सर्वोच्च न्यायालय याला प्रतिबंध घालण्यास असमर्थ ठरत आहेत, ही लोकशाहीची फार मोठी विटंबना आहे.
देशात लाखो महिला अन्याय अत्याचार व कौटुंबिक हिंसाचाराच्या बळी ठरत आहेत तर कित्येक लहान मुलमुली गंभीर आजाराने ग्रस्त असून उपचाराअभावी मृत्यूमुखी पडत आहेत. बेरोजगारीचा विस्फोट झाला आहे तर महागाईने सामान्य माणसाचे कंबरडे मोडले असून त्यांना जीवन जगणे कठीण झाले आहे. देशातील सर्वच प्रकारच्या गुन्हेगारीचा आलेख वाढतो आहे. मात्र राजकारणी व सत्ताधारी यांना याबाबत कसलीही खंत नाही. म्हणून अशा या गंभीर परिस्थितीत लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी, त्यांच्या जीविताचे संरक्षण व्हावे यासाठी न्यायव्यवस्थेने सक्रिय व संवेदनशील होणे काळाची गरज आहे.

प्रा. डॉ.एम.आर.इंगळे
सेवानिवृत्त प्रोफेसर आणि संविधान प्रचारक
तथा विभागीय सचिव डाटा अकोला

# जखमा उरातल्या या..

*मुसळधार कोसळणारा पाऊस नुकताच थांबला होता. पावसामुळे ओलेचिंब झालेल्या झाडांवरून पाण्याचे थेंब टपकत होते. गच्चभरलेलं आभाळ हळूहळू मोकळं होत होतं. अभ्यासिकेतील हँगिंग चेअरमध्ये बसलेले ख्यातनाम समीक्षक. प्रोफेसर डॉ. देवदत्त देशपांडे स्वतःतच हरवून गेले होते. कॉलेजमधून आल्यापासून ते असेच बसून होते. घरकाम करणाऱ्या मावशींनी आणून ठेवलेल्या चहावर साय जमली होती. पण देशपांडेंचं कशाकडेच लक्ष नव्हते.... हवेच्या झुळुकी बरोबर फुलांचा सुगंध दरवळला आणि त्या गंधाने प्रोफेसर देशपांडे अस्वस्थ झाले. त्यांचं मन पंचवीस वर्षे मागे गेले. त्यांना टाळ्यांचा कडकडाट ऐकायला येऊ लागला. प्रेक्षकांनी तुडुंब भरलेले महाविद्यालयाच डोळ्यासमोर दिसायला लागले. आंतर विद्यापीठ स्तरावरील गीत गायन स्पर्धा सुरू होती. वेगवेगळ्या विद्यापीठस्तरावरील स्पर्धक सहभागी झाले होते. स्पर्धकांत विद्यार्थिनींची संख्या अधिक होती. संगीतोत्सव रंगत होता त्याच्या महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करायला देवयानी कु-हेकर मंचावर आली. कविवर्य उमाकांत काणेकर रचित, शोभा गुर्टू यांनी अजरामर केलेली उघड्या पुन्हा जहाल्या जखमा उरातल्या ही गझल देवयानीने अशा नजाकतीने पेश केली की सभागृहातील सगळ्यांनी उभे राहून टाळ्यांचा कडकडाट केला. विद्यार्थी -विद्यार्थिनींनी प्रचंड जल्लोष करीत सभागृह डोक्यावर घेतले.*

स्पर्धा संपली. सभागृह रिकामे व्हायला लागले. रंगमंचावर उभ्या असलेल्या देवयानीजवळ देवदत्त देशपांडे गेला. ओंजळीभर चाफ्याची फुले तिच्या समोर धरत तो म्हणाला ' तुमच्या गाण्याबद्दल ही गिफ्ट. या फुलासारखं ताजं टवटवीत प्रसन्न आणि सुगंधीत आहे ते. गोड आवाज आहे तुमचा. दर्दभरी किनार आहे त्याला. देवदत्त देणगी लाभली आहे तुम्हाला गाण्याला जपा.' त्याच्या नजरेत नजर मिसळत, तिने पुढे केलेल्या ओंजळीत त्याने आपली ओंजळ रिती केली.तिने ओंजळीतल्या चाफ्याच्या फुलांचा दीर्घ सुगंध घेतला 'अहाहा, आवडली बरं तुमची गिफ्ट. तुम्हाला कोणी सांगितलं मला चाफ्याची फुलं फार आवडतात म्हणून'. ती स्वतःशीच खुदकन हसली तेव्हा तिच्या गालावरच्या नाजूक खळीकडे त्याचं लक्ष गेलं अन् नजर तिथेच गुंतून पडली. हळूहळू त्यांची मैत्री झाली. महाविद्यालयातील गर्ल्स कॉमनरूम समोर आणि कॉलेज गार्डनमध्ये चाफ्याची झाडे होती. ती दिसली की तो चाफ्याची फुले तिच्यापुढे करी आणि तीही अगदी अगत्याने घेई. शब्दापलिकडल्या भावना डोळ्यातून व्यक्त होत ती विज्ञान शाखेतील पदवीपूर्वची विद्यार्थिनी तर तो कला शाखेतील पदव्युत्तर अभ्यासक्रमाचा विद्यार्थी. तिच्या तासिका संपल्यावर संगीत शिकायला ती संगीत विभागात यायची त्याच्या विभागाला लागूनच संगीत विभाग होता. ती आली की तो तिच्या ओंजळीत चाफ्याची फुले ठेवी. ती त्यांचा दीर्घ गंध घेऊन दोन फुले वेणीत माळायची.अनेकदा कॉलेज ऑफिससमोर, गार्डनच्या कंपाऊंडजवळ तो मित्रांसोबत उभा असे. दुरून ती येताना दिसली की मित्र म्हणायचे' ती बघ, तुझी चाफेकळी येतेय ती समोर आली की त्यांची नजरानजर होई. न बोलता, दोघांच्या ही डोळ्यातले भाव अंतरीचे गुंज सांगून जात.

वर्ष संपत आले... पंधरा दिवस ती महाविद्यालयात दिसली नाही. तो अस्वस्थ झाला. तिच्यासाठी आणलेली चाफ्याची फुले रोज सुकून जायला लागली.. अखेर न राहून तिच्या मैत्रिणीला त्याने गाठलं. तिची चौकशी केली तेव्हा तिचे वडील वारल्यानं ती गावाला गेल्याचे कळले. ती लहान असताना आई गेली आणि आता वडील. त्याला धक्काच बसला, सांत्वन करायला तिच्या गावाला जाऊन यावं असं त्याला वाटलं. पण त्याने सावरलं.आई-वडीलांपासून पोरकी असलेल्या देवयानीचे काका तिचं लग्न ठरवत असल्याचा निरोप मिळताच तो तिच्या काकांना भेटायला घरी गेला. तिचा चेहरा मलूल झाला होता. काकांसमोर त्याने हात जोडले. हे माझं फायनल इयर आहे. पुढच्या वर्षी मला नोकरी लागेल. तोपर्यंत थांबा.' त्याने विनवणी केली. ' हे बघ, तुझं शिक्षण कधी पूर्ण होणार आणि नोकरी कधी लागणार? चांगल्या स्थळाकडून मागणी आली आहे. मुलगा डॉक्टर आहे. घरी संत्र्याचे बगीचे आहेत. आणखी काय हवं?' त्याने हात जोडले. विनवणी केली. पण तिचे काका काही ऐकून घ्यायलाच तयार नव्हते. त्यांनी स्पष्ट नकार दिला. एका रविवारी, तिचं लग्न लागत होतं तेव्हा आता जगायचं तरी कोणासाठी' या भावनेनं निराशाग्रस्त झालेला तो, रेल्वे लाईनजवळ गाडीची वाट पाहत उभा होता. धाडधाड करत समोरून गाडी आली पण पाय जणू जमिनीला घट्ट चिकटून बसले होते. गाडी निघून गेली. आपल्या दुबळेपणाची त्याला चिड आली माघारी फिरला. त्या क्षणापासून त्याचं आयुष्य बदलून गेलं. देवदत्त देशपांडे ग्रंथालयात संपूर्ण वेळ वाचनात व्यतीत करू लागला. कुणातही मिसळेनासे झाला. पदव्युत्तर परीक्षेत तो सुवर्ण पदकाचा मानकरी. नोकरीच्या मागे न लागता डॉक्टरेटचा अभ्यास करायला लागला. पीएच.डी मिळाली आणि महाविद्यालयात व्याख्याता म्हणून रुजू झाला. अल्पावधीतच शैलीदार शिकविणारे प्राध्यापक म्हणून डॉ. देवदत्त देशपांडे ओळखले जाऊ लागले. स्वतःला सतत वाचनात गुंतवून ठेवायला लागले. व्याख्यानमाला. सभा संमेलनातील त्यांचा सहभाग वाढायला लागला. विविध नियतकालिकातून त्यांचे साहित्य प्रसिद्ध व्हायला लागले. डॉ. देवदत्त देशपांडे यांचं नाव, साहित्यिक समीक्षक म्हणून साहित्य क्षेत्रात आदराने घेतले जायला लागले. एरवी अबोल वाटणारे, ऋजू स्वभावाचे डॉ. देशपांडे वर्गामध्ये शिकविताना रंगून गेलेले असत. मराठी विभागातील पदव्युत्तर अभ्यासक्रमातील कवितांचा पेपर ते शिकवीत. त्यात व्यत्यय नको म्हणून सलग दोन तासिका ते घेत. त्यांच्या शैलीदार शिकविण्यामुळे इतर महाविद्यालयातील विद्यार्थी ही त्यांच्या तासाला येऊन बसत. आजही, प्रोफेसर डॉ देवदत्त देशपांडे गोविंदाग्रजांच्या 'वाग्वैजयंती 'मधील प्रेम कवितांचे विवेचन करून आपल्या केबिनमध्ये येऊन बसले. त्यांना थकवा जाणवत होता. त्यामुळे डोळे मिटूवून घेत ते खुर्चीमध्ये विसावले. 'सर, आत येऊ का?' आवाज ओळखीचा वाटला म्हणून डॉ. देशपाडेंनी डोळे उघडून समोर पाहिले आणि ते दचकले. गोंधळून गेले. त्यांचा विश्वासच बसेना. पंचवीस वर्षांपूर्वीची देवयानी यावेळी आपल्या समोर समोर उभी कशी ? ते अनिमिष नेत्रांनी बघत राहिले. ' सर, मी मनवा. किती सुंदर विवेचन करता तुम्ही. तुमच्याबद्दल खूप ऐकले होते, पण आज प्रत्यक्ष अनुभव आला. मला आपल्याशी थोडं बोलायचंय. चालेल का?'

बाहेर आकाश काळवंडून आलं होतं आभाळ गडगडायला लागले प्रोफेसर देशपांडेनी स्वतःला कसं बसं सावरलं. 'आता मला निघायला हवं. प्लिज, नंतर भेटता का?' तिला समजावीत, आपल्या सहकाऱ्याला घरी सोडायची विनंती करीत ते डिपार्टमेंटमधून बाहेर पडले. प्रोफेसर डॉ. देवदत्त देशपांडे यांनी घरात पाय ठेवला तोच मुसळधार पाऊस बरसायला लागला. प्रोफेसर आपल्याच विचारात गढून गेले होते. ते सरळ अभ्यासिकेत गेले आणि हँगिगं चेअरमध्ये त्यांनी स्वतःला झोकून दिलं. गेली पंचवीस वर्षे ज्या आठवणींना ते टाळण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होते त्या जिवंत होऊन डोळ्यासमोरून तरळून जायला लागल्या. देवयानीच्या आठवणीने त्यांना गलबलून आलं. ते व्याकूळ झाले. इतक्या वर्षात आज पहिल्यांदाच त्यांचे डोळे वाहायला लागले. ते तसेच वाहू देत त्यांनी डोळे मिटून घेतले आणि ते स्वतःत हरवून गेले. पावसाने विश्रांती घेतली होती. तिने बेल वाजवली. घरकाम करणाऱ्या मावशींनी दार उघडले.

'सर आहेत'? 'हो, आहेत. अभ्यासिकेत आहेत.' 'मला भेटायचय त्यांना.' 'फार महत्त्वाचे काम आहे काय? बहुधा त्यांची प्रकृती ठीक नसावी. कॉलेजमधून आल्यापासून कसल्यातरी चिंतेत आहेत.' सरांची भेट होणार नाही या कल्पनेने ती अस्वस्थ झाली.' मावशी, माझं खूपच महत्त्वाचे काम आहे सरांकडे. मला भेटायचय त्यांना तिचे डोळे पाणावले. ते बघून मावशीने तिला अभ्यासिका दाखविली. 'सर.' तिने दरवाजातून साद दिली. पण देशपांडेंनी कोणताच प्रतिसाद दिला नाही. त्यांच्या समोर ती उभी राहिली. त्याबरोबर देशपांडेंच लक्ष तिच्या कडे गेलं. 'तुम्ही ? इथे ?'

'सर, मी मनवा.. मला पाहिल्यावर तुमची जी अवस्था झाली त्याचं कारण मला माहिती आहे. तुम्हाला पंचवीस वर्षांपूर्वीची देवयानी आठवली. देवयानी माझी आई. आम्हा दोघींमध्ये विलक्षण साम्य आहे. म्हणूनच मला पाहिल्यावर तुम्हाला धक्का बसला.' प्रोफेसर डॉ. देवदत्त देशपांडे अविश्वासाने बघत राहिले. सर, तुम्हा दोघांच्या आयुष्यात जे घडलं ते फार क्लेशकारक आहे. परावलंबी असलेल्या आईला मनाविरुद्ध लग्न करावं लागलं. माझा जन्म झाला आणि दोन वर्षांनी माझे वडील अपघातात गेले. माझ्यासाठी आई जगत राहिली खरी पण त्या जगण्याला काही अर्थ नव्हता. तुम्हाला ती कधीच विसरली नाही तुमचे लेख, तुमच्या बद्दल छापून येणाऱ्या बातम्या, ती जमा करून ठेवायची. तोच तिचा विरंगुळा होता. सभा संमेलनातील तुमचा सहभाग, तुमचा वाढत जाणारा लौकिक यांचा तिला विलक्षण अभिमान वाटायचा ती तुमच्या आठवणीतच गुंतून गेली होती. 'कुणासाठी गायचं' म्हणत गाणं कायमचं हरवलं. काकांमुळे आयुष्याची माती झाली या भावनेने लग्नानंतर ती कधीही माहेरी गेली नाही. सर, आजही ती तुमच्या आठवणीतच जगते आहे आणि तुम्हीही तिला विसरला नाहीत हे मला माहिती आहे सर..

ती उठली. हँगिंग चेअरमध्ये बसलेल्या डॉ. देवदत्त देशपांडेजवळ आली, त्यांच्या पायाजवळ बसत ती विनवायला लागली. 'सर, तिचा स्वीकार करा. नाही म्हणू नका सर, तेव्हा नियतीमुळे एकत्र येणं शक्य झालं नाही. पण आता तरी दोघं एकत्र या. तिला अंतर देऊ नका. तिचा स्वीकार करा. सर... डॅड.... प्लिज.... डॅड...'

डॉ. सुभाष गढीकर
९८५०८२४५९०

सिटी न्यूज अकोला
रविवार दि. २१ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## हिवरखेडला एकाच दिवशी तीन चोऱ्या

**हिवरखेड :** भारतीय सैन्य दलाचे जवान गोपाल रमेश भगत यांच्या निवासस्थानी चोरी झाल्याचे उघडकीस आल्या सोबतच चोरट्यांनी आणखी दोन मोटरसायकल सुद्धा एकाच दिवशी चोरल्या होत्या. मकसूद खां हमीद खां वेल्डिंग वाले गोर्धी वेस यांची मोटरसायकल क्र. MH30 BR 0853 ही मोटर सायकल चोरट्यांनी चिचारी रस्त्याने पळवून नेली. परंतु नंतर ती चोरलेली मोटरसायकल वसीम बेग मिर्झा यांच्या घरासमोर सोडून मतीन बेग वकील बेग यांच्या मालकीची मोटर सायकल क्रमांक श्प ३०ँ– ०७०६ ही मोटरसायकल चोरून चोरटे पसार झाले आहेत. त्यामुळे एकाच दिवशी



चोरीच्या तीन मोठ्या घटना घडल्या आहेत. त्यापैकी एक मोटरसायकल चोरट्यांनी सोडून दिली आहे. त्यामुळे हिवरखेड पोलिसांसमोर चोरट्याचे आव्हान उभे आहे.

# आंतरराष्ट्रीय योग दिन सामूहिक प्रात्यक्षिकांनी साजरा

## डॉ. पं. दे. कृ. वि. दीक्षांत सभागृहात कार्यक्रम









प्रतिनिधी २१ जून

**अकोला :** जिल्हा प्रशासनातर्फे आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्त डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ येथील दीक्षांत समारंभ सभागृहात योग मार्गदर्शन व प्रात्यक्षिक कार्यक्रम झाला. विविध क्षेत्रातील मान्यवर, जेष्ठ नागरिक, महिला, युवक विद्यार्थी आदींनी मोठ्या संख्येने सहभागी होत सामूहिक योग प्रात्यक्षिकातून योग दिन साजरा केला.

डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे, जिल्हा क्रीडा अधिकारी नंदा खुरपुडे यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, मेरा युवा भारत केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना, शिक्षण विभाग, पोलीस प्रशिक्षण केंद्र, एन.सी.सी., स्काऊट गाईड, होमगार्ड, पतंजली योग समिती, आर्ट ऑफ लिव्हिंग, योग भारती, क्रीडा भारती, अकोला योग परिषद, विविध सामाजिक संस्था तसेच शासकीय व निमशासकीय कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी, शिक्षक व विद्यार्थी कार्यक्रमात सहभागी झाले.

## नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ : दिलीप स्वामी



प्रतिनिधी २१ जून

**अकोला :** योग ही भारताची जगाला दिलेली अमूल्य देणगी असून निरोगी, तणावरहित आणि सकारात्मक जीवनशैलीसाठी योगाचा अंगीकार करणे काळाची गरज आहे.असे प्रतिपादन महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक दिलीप स्वामी यांनी केले.

ते आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ (महाबीज) मुख्यालयात आयोजित योग दिन कार्यक्रमात बोलत होते. यावेळी महाव्यवस्थापक (प्रशासन) डॉ. एस. एस. गरकल, महाव्यवस्थापक (विपणन)व्ही.आर.देशमुख, महाव्यवस्थापक (प्रक्रिया)पी. जी. पागृत, महाव्यवस्थापक (उत्पादन) व्ही. व्ही. ठाकरे, प्रफुल्ल लहाने महाव्यवस्थापक गुनि, यादव महा व्यवस्थापक वित्त यांच्यासह महाबीज मुख्यालयातील विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाराष्ट्र योगशिक्षक संघ अमरावती विभाग प्रमुख डॉ.चंद्रकांत अवचार, अर्चना काठोडे, नरेंद्र मुळे, योगशिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष डॉ. उल्हास मोकळकर व योगा क्वीन सदस्य प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली योगासने, प्राणायाम आणि ध्यानधारणा करण्यात आली.

## एकल महिला धोरणासाठी २३ रोजी जिल्हास्तरीय बैठक

प्रतिनिधी २१ जून

**अकोला :** राज्यातील विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता, अविवाहित तसेच इतर एकल महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी स्वतंत्र व व्यापक ‘एकल महिला धोरण’ तयार करण्यात येत आहे. या धोरणाच्या निर्मितीत नागरिकांचा सक्रिय सहभाग मिळावा आणि धोरण अधिक परिणामकारक व लोकाभिमुख व्हावे, यासाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाच्या वतीने मंगळवार, दिनांक २३ जून २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता महिला व बाल विकास भवन, संतोषी माता मंदिराजवळ, अकोला येथे जिल्हास्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले असून या दिवशी एकल महिला दिवस साजरा केला जाणार आहे

जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा मीना यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या बैठकीत एकल महिलांच्या विविध समस्या, अडचणी आणि त्यांच्या निराकरणासाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील एकल महिला, नागरिक, स्वयंसेवी संस्था, महिला संघटना, सामाजिक कार्यकर्ते, अभ्यासक आणि विषयतज्ज्ञ यांनी या धोरण निर्मिती प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा.

## हिवरखेड पोलिस स्टेशनमध्ये परस्पर संबंधित गुन्हे दाखल

**हिवरखेड :** पोलिस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या ग्राम चागलंवाडी येथे दोन गटात तुफान राडा झाला असून पोलिस स्टेशन येथे दोन्ही गटातील आरोपीविरूद्ध परस्पर गुन्हे दाखल करण्यात आले, टॅक्टर रस्त्यावरुन काड या कारणावरून डवले व कटू या दोन्ही फिर्यादी आरोपी विरूद्ध पोलिसांनी कलम ११५,(२) ११८,(१) ३२४(५) ३५२, १९०, १९१ यासह १३५, कलम नुसार गुन्हे दाखल करण्यात आले असून यामधील काही आरोपी जखमी झाले त्यांना अकोला सर्वोपचार दवाखान्यात रवाना करण्यात आले या घटनेचा हिवरखेड पोलिस तपास करीत आहेत.

## उमेद अभियानांतर्गत हिवरखेडमध्ये उन्नती ग्राम संघाचे फलक



प्रतिनिधी २१ जून

**हिवरखेड :** येथील स्थानिक प्रभाग क्रमांक एक मध्ये उन्नती ग्राम संघाच्या सर्व महिलांनी एकत्र येऊन हे फलक तालुका व्यवस्थापक तसेच जिल्हा व्यवस्थापक यांच्या मार्गदर्शनाखाली उभारले. सर्वप्रथम महिलांनी फलक समोर साफसफाई केली. नंतर रांगोळी काढली. व फलकची पूजा करण्यात आली. यावेळी उन्नती ग्राम संघाचे अध्यक्ष सौ उषा राठोड व सचिव सौ योगिता भोपळे यांनी फलकाला हार अर्पण केले . हिवरखेड मध्ये सन २०१९-२० मध्ये उमेद अभियानाची सुरुवात झाली होती. उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत ग्रामीण भागातल्या महिलांना सक्षम करण्याकरिता एक पाऊल सुरुवात केले. हिवरखेड मध्ये उमेद अभियानाचे लावलेले लहानसे रोपटे आज वटवृक्ष झाले आहे. सुरुवातीला महिला स्वयंसहायता संघ निर्माण झाले नंतर. प्रभाग संघाच्या माध्यमातून ग्राम संघ निर्माण झाले. महिला शक्ती प्रभाग संघाच्या माध्यमातून उन्नतीसारखे ग्रामसंग निर्माण झाले. कमी व्याजदर मध्ये कर्ज उपलब्ध करून देऊन. महिलांना सक्षम बनवायची कर्तव्य करीत आहे. दिनांक २०-०६ ०२६ रोजी हिवरखेड प्रभाग क्रमांक एक मध्ये उन्नती महिला ग्राम संघाचे फलक लावण्यात आले. यावेळी उपस्थित महिला शक्ती प्रभाग संघाच्या सचिव , तसेच उन्नती महिला ग्राम संघाचे अध्यक्ष सौ उषा राठोड, उपाध्यक्ष सौ योगिता भोपळे , कोषाध्यक्ष सौ कीर्ती गुजर, ग्रामसखी सौ अनिता इंगळे आदी उपस्थित होत्या.

## महिला पतंजली योग समितीचे सराव शिबीर



प्रतिनिधी २१ जून

**अकोला :** आंतरराष्ट्रीय योग दिवस निमित्त महिला पतंजली योग समितीतर्फे दोन दिवसीय महिलांकरीता सराव शिबिराचे आयोजन एकोणवीस व २० जून रोजी राजराजेश्वर योगासन मंडळ मेतकर संकुल डाबकी रोड येथे घेण्यात आले. पतंजली योग समितीच्या संघटन प्रमुख अकोलाच्या योगशिक्षिका डॉक्टर सौ माधुरी प्रवीण सोनी यांनी शिबिराला मार्गदर्शन केले शिबिराकरिता पतंजली योग समितीच्या जिला प्रभारी डॉ. स्वातीताई पोटे या सुद्धा हजर होत्या. त्यांनी सुद्धा मार्गदर्शन केले. शिबिरा करिता संवाद प्रभारी पार्वती निमकर्दे, लता वानखडे, माया रायबोले, आशा बडे, सुनंदा पुरी शीला सूर्यवंशी, यशोदा बाहेकर, सुवर्णा पाटील, कुंदा काटोलकर रेखा खंडारकर, आशा भोले, मांडोलकर, सुभद्रा सुरत्ने, कस्तुराबाई पटोकार यांनी लाभ घेतला.

## न्यू इंग्लिश हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या तीन विद्यार्थ्यांची इन्स्पायर मानकमध्ये निवड



प्रतिनिधी २१ जून

**अकोला :** विज्ञान व तंत्रज्ञान विभागाच्या प्रतिष्ठित इन्स्पायर मानक २०२५-२६ योजनेअंतर्गत न्यू इंग्लिश हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या तीन विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण वैज्ञानिक कल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या या राष्ट्रीय स्तरावरील योजनेत शाळेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये आदर्श प्रमोद गवई (इयत्ता ६ वी), कार्तिक शंकर चितोडे (इयत्ता ६ वी), घनश्री मनीष नाईक (इयत्ता ११ वी) यांचा समावेश आहे. शशिकांत बांगर, श्रीकांत रत्नपारखी व अटल लॅब प्रमुख उदय कोल्हेकर त्यांचे मार्गदर्शक होते.संस्थेच्या व शाळेच्या शतक महोत्सवी वर्षाच्या सुरवातीला मिळवलेल्या या यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, शिक्षक व पालकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.प्राचार्य माधव मुनशी यांनी विद्यार्थ्यांनी केलेल्या मेहनतीचे हे फलित असून भविष्यातही ते विज्ञान क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करतील, असा विश्वास व्यक्त केला.

## डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील प्रकल्पग्रस्त विशेष भरती प्रक्रिया पूर्ण करा



प्रतिनिधी २१ जून

**अकोला :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ प्रकल्पग्रस्त विशेष भरती अंतर्गत गट ‘क’ व गट ‘ड’ संवर्गातील विविध पदांसाठी २५ व २७ फेब्रुवारी २०२५ रोजी जाहिराती प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या. मात्र १७ महिने होऊनही भरती प्रक्रिया अद्याप पूर्ण करण्यात आलेली नाही.

भरती प्रक्रियेनुसार गट ‘ड’ संवर्गातील मजूर, चौकीदार व माळी पदांसाठी उमेदवारांची शारीरिक व व्यावसायिक चाचणी ०८ ते १३ सप्टेंबर २०२५ दरम्यान घेण्यात आली. त्यानंतर दिनांक २६, २७ व २८ नोव्हेंबर २०२५ रोजी टीसीएस संस्थेमार्फत गट ‘क’ व गट ‘ड’ मधील काही पदांसाठी ऑनलाइन परीक्षा घेण्यात आली. परीक्षेचा निकाल दिनांक २४ जानेवारी २०२६ रोजी जाहीर करण्यात आला. त्यानंतर पात्र व अपात्र उमेदवारांच्या याद्या प्रसिद्ध करून विविध पदांसाठी उमेदवारांच्या शैक्षणिक कागदपत्रांची व प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यात आली. विद्यापीठ प्रशासनाच्या पत्रानुसार जिल्हा पुनर्वसन अधिकारी, अकोला यांनीही संबंधित प्रमाणपत्रांची पडताळणी करून अहवाल १ एप्रिल २०२६ रोजी प्राप्त झाला. तरीदेखील भरती प्रक्रियेस अंतिम स्वरूप देण्यात आलेले नाही. या संदर्भात प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी आमदार रणधीरभाऊ सावरकर यांच्या माध्यमातून कुलगुरू व कुलसचिव यांची भेट घेऊन भरती प्रक्रिया १५ जून २०२६ पर्यंत पूर्ण करण्याची विनंती केली होती. मात्र अद्याप विद्यापीठ प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही अथवा निश्चित कालमर्यादा जाहीर करण्यात आलेली नाही.

## शेतात वन्यप्राण्यांनी घातला धुडगूस



प्रतिनिधी २१ जून

**हिवरखेड :** तेल्हारा तालुक्यात बागायतदार शेतकऱ्यांनी शेतात कपाशी लागवड केली. परंतु शेतात वन्यप्राण्यांनी धुडगूस घातला असून शेतातील कपाशी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान करीत आहे. यामुळे शेतकरी हतबल झाले आहेत या गंभीर बाबीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे.

तालुक्यात बागायती पट्टा असल्याने शेतकऱ्यांनी या महिन्यात सुरुवातीला कपाशी लागवड केली. कपाशी जगविण्यासाठी रात्री बेरात्री मेहनत करून पीक जगवत आहे. मात्र कपाशी पीक जमिनीवर वर येताच शेतात वन्यप्राणी कपाशी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान करीत आहेत. या चिंतेने शेतकरी हतबल झाले आहेत. शेतात नुकसान होऊ नये यासाठी शेतकरी शेतात रात्री जागरण करून पिक जगवत आहे मात्र तरीही हरिण रानडुक्कर हे पिकांचे नुकसान करित आहेत या गंभीर बाबीकडे वनविभागाच्या अधिकाऱ्यांनि लक्ष पुरवुन वन्यप्राण्यांच्या बंदोबस्त करावा अशी मागणी होत आहे

मी दोन एकरात कपाशी लागवड केली. पीक जगविण्यासाठी रात्री बेरात्री शेतात रखवाली करीत आहे. तरीही हरिण रानडुक्कर हे पिकांचे नुकसान करीत आहे.

## शहराच्या वीज पुरवठ्यात व्यत्यय

**अकोला :** महावितरणच्या अकोला शहर विभाग अंतर्गत येणाऱ्या जठारपेठ फीडर अंतर्गत लहान उमरी परिसरात विजेच्या कमी तर कधी उच्चदाबाच्या समस्यांनी नागरिक त्रस्त आहेत. कोल्हटकर मंगल कार्यालय परिसरासह लहान उमरी परिसरात दिवसभरात अनेकदा वीज पुरवठा खंडित होत असल्याच्या तक्रारी आहेत.

### निधन वार्ता

**ॲड. अनिल जगताप**



**अकोला:** न्यू तापडियानगर मध्ये क्रांती चौकातील रहिवासी ॲड अनिल जगताप यांचे शनिवारी रात्री अल्पशा आजाराने निधन झाले.

# योग हीच जीवनशैली, आरोग्याची खरी गुरुकिल्ली : गजानन हरणे



प्रतिनिधी २१ जून

**अकोला :** आधुनिक युगातील धावपळ, ताणतणाव आणि बदलत्या जीवनशैलीमुळे मानवी आरोग्यापुढे उभ्या राहिलेल्या विविध आव्हानांवर मात करण्यासाठी योग हेच प्रभावी औषध असून, ’करा योग, रहा निरोग’ हा मंत्र प्रत्येकाने जीवनात अंगीकारला पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक तथा योग शिक्षक गजानन हरणे यांनी केले.

जागतिक योग दिनाचे औचित्य साधून डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथील गुरुदेव मॉर्निंग क्लबच्या वतीने रविवार, दि. २१ जून रोजी सकाळी ६.३० वाजता योगविषयक विशेष मार्गदर्शन व प्रात्यक्षिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ’धकाधकीचे जीवन आणि योग’ या समकालीन व अत्यंत महत्त्वपूर्ण विषयावर गजानन हरणे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी योगासनांबरोबरच प्राणायामाचे प्रात्यक्षिक सादर करून निरोगी जीवनाचा मंत्र दिला.आपल्या मनोगतात ते म्हणाले की, योग ही केवळ व्यायामपद्धती नसून ती शरीर, मन आणि आत्म्याचा समतोल साधणारी जीवनशैली आहे. नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक सुदृढता, मानसिक शांतता आणि आध्यात्मिक उन्नती साध्य होते. निरोगी आणि आनंदी जीवन जगण्यासाठी योग हा भारतीय संस्कृतीने जगाला दिलेला अमूल्य ठेवा आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोमा खर्च होते. यावेळी माजी अध्यक्ष शंकरराव गिऱ्हे, डॉ. हरिदास साखरे, अरुण वाघ, अनिल मोहाळे, विलास नाकट, छगन खंडारे, प्रकाश शेगावकर गुरुजी, सुभाष कातखेडे, विलास राठोड, कार्याध्यक्ष गजानन अनासने, डॉ. यशवंतराव चव्हाण, सचिन बापू देशमुख, सचिन साखरकर, विनोद चितवार, सदाशिवराव नावकार, आसोलकर, केशवराव उमाळे, मनोहर वानखडे, राजेश मोरे, पंकज उपाध्ये आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली. शरीर आणि मनाच्या सुसंवादाचा संदेश देणारा हा उपक्रम उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला. कार्यक्रमाचे संचालन छगन खंडारे यांनी केले, तर आभार प्रदर्शन अरुण वाघ यांनी केले.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ ५२२६
मॉं. गायत्री प्राथमिक शाळा व
स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय
गायत्री नगर. अकोला
आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर,
प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!
वैशिष्ट्ये :
1)अनुभवी शिक्षकवृंद
2)सुसज्ज पायाभूत ईमारत
3)दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
4)सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
5)आनंददायी शिक्षण पध्दती
6)CCTV ची सुविधा
7)कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
8)सुसज्ज प्रयोगशाळा
इयत्ता 1 ली ते 10 वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.
1)इयत्ता 1 ली ते 8 वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
2)इयत्ता 1 ली ते 10 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
3)शालेय पोषण आहार

मॉं गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय
मो. 9921186715, 9511254959, 9421895790, 9960437366

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
रविवार, दि. २१ जून २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# आष्टीकरांनी राजीनामा देऊनच नवा राजकीय संसार थाटावा; मतदारसंघात संतप्त प्रतिक्रिया

प्रतिनिधी २१ जून

**उमरखेड :** हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेची साथ सोडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर उमरखेड-महागाव विधानसभा मतदारसंघासह लोकसभा क्षेत्रात विविध प्रतिक्रिया उमटत आहेत. अनेक मतदारांनी या निर्णयावर नाराजी व्यक्त करत खासदारकीचा राजीनामा देऊन नव्याने जनादेश घ्यावा, अशी मागणी केली आहे.



लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या उमेदवार म्हणून नागेश पाटील आष्टीकर यांना मतदारांनी मोठ्या प्रमाणावर पाठिंबा दिला होता. भाजप व शिंदे गटाच्या विरोधात मतदान करून त्यांना विजयी केले असल्याने पक्षांतराचा निर्णय मतदारांच्या भावनांशी विसंगत असल्याची भावना काही नागरिकांनी व्यक्त केली आहे.

राज्यात यापूर्वी आमदारांच्या पक्षांतरानंतर आता काही खासदारांनीही पक्ष बदलल्याने विरोधी पक्षांचे संघटन कमकुवत करण्याचे प्रयत्न सुरू असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

विशेषतः हिंगोली लोकसभा मतदारसंघातील मतदारांनी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवत मतदान केल्याचा दावा करत, आष्टीकर यांनी नव्या पक्षात जाण्यापूर्वी खासदारकीचा राजीनामा द्यायला हवा होता, असे मत अनेकांनी व्यक्त केले.

सोशल मीडियावरही या घडामोडींवर तीव्र प्रतिक्रिया उमटत असून, "नवा राजकीय प्रवास करायचा असेल तर नव्याने जनतेसमोर जाऊन जनादेश घ्यावा," अशी भूमिका काही मतदारांनी मांडली आहे. पक्षांतरामुळे मतदारांचा विश्वासघात झाल्याची भावना व्यक्त करणाऱ्यांची संख्या लक्षणीय असल्याचे दिसून येत आहे.

दरम्यान, या विषयावर विविध राजकीय पक्षांकडूनही प्रतिक्रिया व्यक्त होत असून, आगामी काळात हिंगोली लोकसभा मतदारसंघातील राजकीय समीकरणांवर या निर्णयाचा परिणाम होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

# एमडी अमली पदार्थ विक्री रॅकेटचा पर्दाफाश

प्रतिनिधी २१ जून

**यवतमाळ :** अमली पदार्थांच्या विक्री, वाहतूक व सेवनाविरोधात यवतमाळ पोलिसांनी सुरू केलेल्या विशेष मोहिमेत वणी पोलिसांना आणखी एक मोठे यश मिळाले आहे. गणेशपूर रोड परिसरात छापा टाकून 19.27 ग्रॅम एमडी (मेफेड्रोन) अमली पदार्थ व मोबाईल फोन असा एकूण 1 लाख 49 हजार 890 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाभर अमली पदार्थविरोधी मोहीम राबविण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने वणी शहरातील गोपनीय माहितीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी 19



जून रोजी रात्री गणेशपूर रोड परिसरात सापळा रचला.

या कारवाईत कौतुक उर्फ गोलू दिलीप मेश्राम (वय 28, रा. तेलीफैल, वणी) याची झडती घेतली असता त्याच्याकडे 19.27 ग्रॅम एमडी (मेफेड्रोन) अमली पदार्थ आढळून आला. जप्त करण्यात आलेल्या अमली पदार्थाची किंमत 1 लाख 34 हजार 890 रुपये असून, त्याच्याकडील 15 हजार रुपयांचा मोबाईल फोनही जप्त करण्यात आला.

चौकशीदरम्यान आरोपीने हा अमली पदार्थ प्रज्योत उर्फ कॉकरोच महेश उपरे याच्याकडून आणल्याची कबुली दिली. त्यानुसार दोन्ही आरोपींविरुद्ध वणी पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्याच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

दरम्यान, यापूर्वी दाखल करण्यात आलेल्या एका एमडी अमली पदार्थ प्रकरणात सहभागी असलेल्या आणखी तीन आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. त्यामध्ये प्रज्योत महेश उपरे, अविनाश विजय पाटील आणि रविंद्र धनराज गुप्ता यांचा समावेश आहे.

अमली पदार्थांविषयी कोणतीही माहिती असल्यास नागरिकांनी पोलिसांशी संपर्क साधावा. माहिती देणाऱ्यांची ओळख गोपनीय ठेवण्यात येईल, असे आवाहन वणी पोलिसांनी केले आहे.

ही कारवाई अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, सहाय्यक पोलीस अधीक्षक रॉबिन बन्सल, पोलीस निरीक्षक भानुदास पिदुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक साजिद सय्यद, सुयोग महापुरे व त्यांच्या पथकाने पार पाडली.

# उष्णतेमुळे नागरिक हैराण; पावसासाठी युवकांचे अनोखे साकडे

प्रतिनिधी २१ जून

**पुसद :** तालुक्यातील वाढत्या उष्णतेने नागरिक हैराण झाले असून, पावसाअभावी शेतकऱ्यांची चिंता दिवसेंदिवस वाढत आहे. जून महिना सरत असतानाही समाधानकारक पाऊस न झाल्याने शेतीकामे खोळंबली असून, शेतकरी चिंतेत आहेत.

रखरखत्या उन्हामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. दुपारच्या वेळेत रस्त्यांवर शुकशुकाट दिसून येत असून, उकाड्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. या पार्श्वभूमीवर पावसासाठी दोन युवकांनी पारंपरिक



पद्धतीने अनोखे साकडे घातले.

अंगावर झाडांची पाने बांधून हे युवक शहरातील प्रमुख रस्त्यांवर फिरले आणि पावसासाठी प्रार्थना केली. त्यांच्या या आगळ्यावेगळ्या उपक्रमाने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. अनेकांनी या उपक्रमाचे कौतुक केले, तर काहींनी ही ग्रामीण भागातील जुनी लोकपरंपरा असल्याचे सांगितले.

दरम्यान, लवकरच पावसाचे आगमन होऊन शेतकऱ्यांना दिलासा मिळावा, पिकांना जीवनदान मिळावे आणि उष्णतेने हैराण झालेल्या नागरिकांनाही आराम मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## विवाहितेच्या मृत्यूप्रकरणी पतीसह तिघे ताब्यात

प्रतिनिधी २१ जून

**आर्णी :** शहराजवळील एका विवाहितेच्या संशयास्पद मृत्यूप्रकरणी आर्णी पोलिसांनी पतीसह तिघांना ताब्यात घेतले असून, आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपांवरून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. मिळालेल्या माहितीनुसार, आर्णी तालुक्यातील साक्षी शिवाजी ठाकरे हिचा विवाह जानेवारी महिन्यात अभिषेक रामेश्वर चौधरी याच्यासोबत झाला होता. गुरुवारी दुपारी साक्षी चौधरी हिचा गळफास घेतलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आला.

घटनेची माहिती मिळताच तिचे वडील, नातेवाईक तसेच गावातील मोठ्या संख्येने नागरिक ग्रामीण रुग्णालयात दाखल झाले. यावेळी मृत्यू संशयास्पद असून हा घातपात असल्याचा आरोप नातेवाईकांनी केला. त्यानंतर संतप्त नागरिकांनी आर्णी पोलीस ठाण्यात धाव घेतली. उपविभागीय पोलिस अधिकारी (एसडीपीओ) यांनी नातेवाईकांची बाजू ऐकून घेतली. साक्षीच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीत पती अभिषेक चौधरी, सासरे रामेश्वर चौधरी, सासू संगीता चौधरी आणि शिवानी रामेश्वर चौधरी यांनी संगनमत करून साक्षीचा शारीरिक व मानसिक छळ केला तसेच हुंड्यासाठी त्रास देत आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आरोप केला आहे. या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी संबंधितांना ताब्यात घेतले असून वृत्त लिहिपर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. दरम्यान, मृत्यूचे नेमके कारण आणि तक्रारीतील आरोपांची सत्यता पोलीस तपासानंतरच स्पष्ट होणार आहे.

# आर्णीत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शिबिर

प्रतिनिधी २१ जून

**आर्णी :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त आर्णी शहरातील अंजली कॉकरी येथे नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले. शहर व तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने या शिबिराचा लाभ घेतला.

शिबिरात एकूण 250 नागरिकांनी नोंदणी केली. त्यापैकी 130 नागरिकांना मनसेच्या वतीने मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले. तसेच मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी



निवड झालेल्या 80 नागरिकांना 21 जून 2026 रोजी नागपूर येथे मोफत नेण्याची व्यवस्था करण्यात आली असून, शस्त्रक्रियेची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती मनसेचे उपजिल्हाध्यक्ष सचिन येलगंधेवार यांनी दिली.

यावेळी बोलताना सचिन येलगंधेवार म्हणाले, "गोरगरीबांची सेवा हीच ईश्वरसेवा असून समाजातील गरजू नागरिकांना आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे हे आपले कर्तव्य आहे." शिबिराचे उद्घाटन सिंधू येलगंधेवार यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाला अंजली डेअरीजचे संचालक राजू श्रीवास, सचिन येलगंधेवार, कपिल ठाकरे, आकाश माटलवाड, अक्षय मारशेटवार, पंकज रत्ने, शुभम मोरे, महेश बांते आणि गौरव बाबरे आदी उपस्थित होते.





■ **यवतमाळ :** यवतमाळ जिल्ह्यातील १३ परीक्षा केंद्रांवर रविवारी नीट (यूजी) पुनर्परीक्षा शांततेत पार पडली. अँग्लो हिंदी हायस्कूल, अमोलकचंद महाविद्यालय, बाबाजी दाते महाविद्यालय, शासकीय तंत्रनिकेतन, लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालय, श्री शिवाजी विद्यालय, राणी लक्ष्मीबाई विद्यालय आदी केंद्रांवर एकूण २,८४७ विद्यार्थी परीक्षेला बसले. गैरप्रकारांच्या आरोपांनंतर होत असलेल्या या पुनर्परीक्षेसाठी प्रत्येक केंद्रावर सीसीटीव्हीद्वारे देखरेख, व्हिडिओ चित्रीकरण व कडेकोट सुरक्षा व्यवस्था करण्यात आली होती. विद्यार्थ्यांची प्रवेशद्वारावर तपासणी करण्यात आली. जिल्हा वाहतूक निरीक्षक ज्ञानोबा देवकते यांनी केंद्रांना भेट देऊन वाहतूक व सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला.

# लाख (खिंड) येथील स्मशानभूमीची दुरवस्था

## बहुजन मुक्ती पार्टीचा आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी २१ जून

**दारव्हा :** तालुक्यातील लाख (खिंड) येथील स्मशानभूमीची दुरवस्था झाल्याने नागरिकांना अंत्यसंस्कारावेळी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. शेड, प्रतीक्षालय आणि पक्का रस्ता नसल्यामुळे विशेषतः पावसाळ्यात परिस्थिती अधिकच गंभीर होत असून, या प्रश्नावर तातडीने उपाययोजना न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा बहुजन मुक्ती पार्टीने दिला आहे.

स्मशानभूमीतील विद्यमान शेडचे पत्रे फुटल्याने पावसाळ्यात त्यातून पाणी गळते. त्यामुळे अंत्यसंस्कार करताना चिता विझण्याची भीती निर्माण होते. तसेच, पावसाच्या दिवसांत नागरिकांना तासनतास पावसात उभे राहून अंत्यविधी पार पाडावे लागतात.

■ गावातील या संवेदनशील आणि मूलभूत समस्येकडे स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. मृत्यूनंतरही नागरिकांच्या नशिबी होणारी ही हेळसांड थांबवावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

याशिवाय स्मशानभूमीकडे जाण्यासाठी पक्का रस्ता नसल्याने चिखलातून वाट काढत प्रेतयात्रा न्यावी लागते. अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्या नागरिकांसाठी बसण्याची कोणतीही सुविधा नसून प्रतीक्षालयाचा अभावही प्रकर्षाने जाणवतो.

या पार्श्वभूमीवर बहुजन मुक्ती पार्टी ने प्रशासनाकडे स्मशानभूमीची



तातडीने दुरुस्ती, नवीन शेड व प्रतीक्षालयाची उभारणी तसेच पक्का रस्ता तयार करण्याची मागणी केली आहे. मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा बिमोद मुधाने यांनी दिला आहे.

दरम्यान, या प्रश्नावर प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# गोदावरी अर्बनकडून महागाव तहसील कार्यालयास वॉटर कुलर भेट

प्रतिनिधी २१ जून

**महागाव :** बँकिंग सेवेसोबत सामाजिक बांधिलकी जपत गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी यांनी महागाव शाखेच्या आठव्या वर्धापन दिनानिमित्त महागाव तहसील कार्यालयाला वॉटर कुलर भेट दिला. या उपक्रमामुळे तहसील कार्यालयात विविध कामांसाठी येणाऱ्या नागरिकांना शुद्ध व थंड पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.

वॉटर कुलरचे उद्घाटन संस्थेचे सहाय्यक महाव्यवस्थापक रवी इंगळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अभय म्हस्के प्रमुख उपस्थित होते.

महागाव तहसील कार्यालयात दररोज तालुक्याच्या विविध भागांतून शेकडो नागरिक शासकीय कामांसाठी




येतात. विशेषतः उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची अडचण जाणवत असल्याने ही गरज लक्षात घेऊन संस्थेने सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून हा उपक्रम राबविला. त्यामुळे नागरिकांच्या तहानेला दिलासा मिळाला असून तहसील कार्यालयातील सुविधांमध्ये भर पडली आहे.

हा उपक्रम संस्थापक हेमंतभाऊ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अध्यक्षा राजश्रीताई पाटील यांच्या प्रेरणेने राबविण्यात आला. व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर, उपमहाव्यवस्थापक सुरेखा दवे आणि एजीएम रवी इंगळे यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाला शाखाधिकारी शशांक ढोबळे, असिस्टंट ऑफिसर सचिन हिंगाडे, जया घड्याले, ज्युनिअर ऑफिसर रामेश्वर शिंदे, सुयोग साकळे, ओमकुमार भोयर, अमोल रावते, प्रवीण आढागळे यांच्यासह शाखेतील कर्मचारी उपस्थित होते. महागाव तहसील कार्यालयात येणाऱ्या नागरिकांच्या मूलभूत सुविधांकडे लक्ष देत राबविण्यात आलेला हा उपक्रम सामाजिक उत्तरदायित्वाचे उत्तम उदाहरण ठरत आहे.

# झरी-जामणीतील प्रलंबित प्रश्नांवर खा.प्रतिभा धानोरकर आक्रमक

प्रतिनिधी २१ जून

**झरी-जामणी :** झरी-जामणी तालुक्यातील विविध प्रलंबित प्रश्न व विकासकामांचा आढावा घेण्यासाठी खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी, मुख्याधिकारी आणि विविध विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

बैठकीत वरपोळ रस्त्याची समस्या, अतिक्रमण पट्टे, सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील अडचणी, कृषी पीक विमा, नगरपंचायतीअंतर्गत क्रीडा संकुलाचे काम तसेच इतर विकासकामांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. विविध




विभागांच्या अधिकाऱ्यांनी संबंधित विषयांची माहिती सादर केली. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक कार्यवाही करून लवकरच तोडगा काढण्याचे आश्वासन दिले.

पीक विम्याच्या मुद्द्यावर काँग्रेसचे झरी-जामणी तालुका अध्यक्ष संदीप बुर्रेवार यांनी शेतकऱ्यांच्या अडचणींबाबत आक्रमक भूमिका घेत अधिकाऱ्यांसमोर प्रश्न ठामपणे मांडले. शेतकऱ्यांना न्याय मिळावा आणि विमा दाव्यांबाबत तत्काळ कार्यवाही व्हावी, अशी मागणी त्यांनी केली.

यावेळी खासदार प्रतिभा धानोरकर यांनी तालुक्यातील विकासकामे गतीने पूर्ण करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जात असल्याचे सांगितले. काही महत्त्वाच्या कामांना मंजुरी मिळाली असून उर्वरित प्रश्नही लवकर मार्गी लावण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

या बैठकीस काँग्रेस तालुका अध्यक्ष संदीप बुर्रेवार, बाजार समिती सभापती राजीव कासावर, माजी सभापती प्रकाश कासावर, भूमारेड्डी बाजानलावार, भगवान चुक्कलवार, गंगाधर आत्राम, सरपंच सुभाष कुळमेथे, सरपंच महेश आयटवार, उर्वते साहेब तसेच विविध विभागांचे अधिकारी आणि पदाधिकारी उपस्थित होते.

# महिलांच्या हक्कांसाठी कायदेविषयक ज्ञानदान शिबिर

प्रतिनिधी २१ जून

**झरी-जामणी :** महिलांच्या हक्कांबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने पंचायत समिती झरी-जामणीच्या सभागृहात कायदेविषयक ज्ञानदान शिबिर उत्साहात पार पडले. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका विधी सेवा समिती, वकील संघ व तालुका प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दीपक दाभाडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून अक्षय रासणे, डॉ. मोहन गेडाम, सतीश जाधव, मिलिंद सरकटे, सहाय्यक गटविकास अधिकारी मुंढे, सरकारी वकील कपूर तसेच वकील संघाचे अध्यक्ष भोयर उपस्थित होते.

शिबिरात महिलांवरील अत्याचार,




कौटुंबिक हिंसाचार, कार्यस्थळी लैंगिक छळ, बालविवाह प्रतिबंध, वारसा हक्क, घटनात्मक अधिकार, महिला संरक्षण कायदे, मोफत कायदेशीर मदत योजना आणि सायबर गुन्ह्यांपासून संरक्षण यांसारख्या विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. महिलांनी अन्यायाविरुद्ध निर्भयपणे आवाज उठवून उपलब्ध कायदेशीर उपाययोजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन मान्यवरांनी केले.

अध्यक्षीय समारोपात दीपक दाभाडे यांनी महिलांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक सक्षमीकरणासाठी कायद्याचे ज्ञान आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच विधी सेवा प्राधिकरणामार्फत गरजू नागरिकांना मोफत कायदेशीर सहाय्य उपलब्ध करून दिले जात असल्याची माहिती दिली. यावेळी वकील संघाचे सदस्य काटकर, मडिकुंटावार, बोथले, न्यायालयीन सहाय्यक अधीक्षक पी. पी. शिरसाट, कर्मचारी अमोल झोडे तसेच पॅरा विधी स्वयंसेवक प्रकाश बेरेवार, सुधाकर टेकाम, लवकुश उरवते, राजू कांबळे आणि प्रितेश सोरते उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. दीपक काटकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन ॲड. राहुल बोथले यांनी मानले.

## नागरिकांच्या तक्रारी पोलीस अधिकाऱ्यांनी सोडवल्या

**अमरावती :** जिल्हा पोलीस अधीक्षक निकेतन कदम, यांनी पोलीस घटकामध्ये सर्व पोलीस स्टेशन मध्ये प्रत्येक शनिवारी तक्रार निवारण दिवस राबविण्याबाबत सुचणा देण्यात आलेले आहे या निमीत्ताने सर्व पोलीस स्टेशन मध्ये प्राप्त होणारे नागरीकांच्या तक्रारी ऐकुण तात्काळ कार्यवाही करण्याबाबत सर्व ठाणेदार यांना आदेशीत करण्यात आले आहे. त्यानुसार आज दिनांक २०/०६/२०२६ रोजी निकेतन कदम, पोलीस अधीक्षक अमरावती ग्रामीण हे पोलीस स्टेशन मोर्शी व दत्ता तोटेवाड, अपर पोलीस अधिक्षक, अमरावती ग्रामीण हे पोलीस स्टेशन लोणी येथे प्रत्यक्ष उपस्थित राहीले तसेच संबंधीत विभागाचे उप-विभागीय पोलीस अधिकारी त्यांचे अधिनस्त पोलीस स्टेशन येथे उपस्थित राहुन तसेच सर्व पोलीस स्टेशनचे ठाणेदार हे आपआपले पोलीस स्टेशन मध्ये तक्रार निवारण दिवशी नागरीकांच्या एकुण २०७ तक्रारीचे निराकरण करण्यात आले आहे.

# अप्पर वर्धा प्रकल्पाचे महामेरू प्रा. बी. टी. देशमुख अनंतात विलीन





**अंत्ययात्राही वेळेवरच**

शासन निर्देशानुसार बी. टी. देशमुख यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी सांगितले होते. शनिवारी सायंकाळी ठीक पाच वाजता अंत्ययात्रा निघाली.

**अंतिम भेट राहिली, रस्त्यातच मिळाली वार्ता**

माजी आमदार बी.टी. देशमुख यांना दोन विवाहित मुली आहेत. यापैकी प्रा. डॉ. वैशाली वानखडे ह्या येथील आयुर्वेदिक महाविद्यालयात प्राध्यापक आहेत. त्या अमरावतीला वास्तव्याला आहेत. तर दुसरी कन्या डॉ. सायली लाड ह्या पंढरपूर येथे स्कीन स्पेशालिस्ट आहेत. डॉ. सायली ह्या पंढरपूरवरून शुक्रवारी दुपारी वडिलांच्या भेटीसाठी अमरावतीला यायला निघाल्या होत्या. दुदैवाने प्रवासातच त्यांना सरांच्या मृत्यूची वार्ता कळली.

प्रतिनिधी २१ जून

**अमरावती:** विदर्भाच्या सिंचन अनुशेषाचा लढा दिल्ली आणि मुंबईच्या तख्तापर्यंत गाजवणारे जलमहर्षी, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, पत्रकार तथा माजी आमदार प्रा. बी. टी. देशमुख हे शनिवारी सायंकाळी अनंतात विलीन झाले.

अमरावतीकरांसाठी पाणी आणून भगीरथ ठरलेले अप्पर वर्धा प्रकल्पाचे महामेरु प्राध्यापक बी.टी देशमुख सर होते.

त्यांच्या निधनाने विदर्भाच्या हक्कासाठी लढणारा एक अभ्यासू सूर्य मावळला असून, संपूर्ण अमरावतीसह महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. शनिवारी सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास स्थानिक हिंदू स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवाला जड अंतःकरणाने भडाग्नी देण्यात आला. या जननायकाला अखेरचा निरोप देण्यासाठी राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील दिग्गजांसह हजारोंचा जनसागर उसळला होता. बी.टी. सरांवर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी त्यांच्या कन्या डॉ. सायली लाड व डॉ. वैशाली वानखडे यांनी वडिलांच्या पार्थिवाला मुखाग्नी दिला.

शासनाच्या वतीने शासकीय मानवंदना देत हवेत तीन वेळा फैरी झाडून त्यांना सलामी देण्यात आली. शासनाच्या वतीने जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी देशमुख यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.

पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, विभागीय आयुक्त नयना गुंडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, पोलिस आयुक्त राकेश ओला यांनी त्यांना पुष्पचक्र वाहिले. यावेळी माजी मंत्री सुनील देशमुख, उपमहापौर सचिन भेंडे, माजी खासदार अनंत गुढे, सुनील राणा, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, विरोधी पक्षनेता विलास इंगोले, मिलिंद चिमोटे, एसडीओ अनिल भटकर,

निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, संपादक प्रकाश पोहरे,

श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष एडवोकेट गजाननराव पुंडकर, कार्यकारणी सदस्य हेमंत काळमेघ, शिक्षक आमदार सरनाईक, प्राचार्य दीपक धोटे, डॉ. गणेश खारकर, दिलीप एडतकर, प्रा. प्रफुल्ल गवई, पप्पू पाटील, जगदीश गोवर्धन, सहकार नेते वसंत घुईखेडकर, दिनेश सूर्यवंशी, नुटाचे एफ. सी. रघुवंशी, राजापेठचे ठाणेदार संदीप चव्हाण, विलास नांदुरकर, अविनाश दुधे, डॉ. प्रफुल्ल कडू, प्रा. राजेश जयपूरकर, प्रा. तुषार देशमुख, माजी आमदार वीरेंद्र जगताप यांच्यासह हजारोंच्या संख्येने शिक्षण क्षेत्रातील व राजकीय क्षेत्रातील मंडळी यावेळी उपस्थित होते.

---

### संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

## निरोगी आरोग्यासाठी योग आवश्यक - कुलगुरू डॉ. मिलींद

प्रतिनिधी २१ जून



**अमरावती:** आजच्या बदलत्या सामाजिक वातावरणात आणि कौटुंबिक वास्तव पाहता, आपले आरोग्य सुदृढ ठेवणे हे सर्वांत मोठे आव्हान आहे. म्हातारपण सुखाचेआणि निरोगी जाण्यासाठी आरोग्याची काळजी घेणे अत्यंत महत्त्वाचे असून, त्यासाठी प्रत्येकाने योगाभ्यासाची कास धरली पाहिजे, असे आवाहन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले.विद्यापीठाच्या 'आजीवन अध्ययन व विस्तार विभाग', 'एम.ए. योगशास्त्र'व 'पी.जी. डिप्लोमा योगा थेरपी' यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठ विद्यार्थी विकास विभाग परिसरात अकरावा आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात आणि योगप्रेमींच्या उत्स्फूर्तउपस्थितीत साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी उपस्थितांना संबोधित करताना ते बोलतहोते. याप्रसंगी व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिवडॉ. अविनाश असनारे, आंतरराष्ट्रीय योग प्रशिक्षक डॉ.सुप्रिया चकोले, शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या डॉ.निता गिरी, वित्त व लेखा अधिकारी सीए पुष्कर देशपांडे, आजीवन अध्ययन व विस्तारचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, रासेयोसंचालक डॉ. निलेश कडू, उपकुलसचिव श्री मंगेश वरखेडे आणिजनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते. या योग शिबिरात पुणे येथील आंतरराष्ट्रीय योगचिकित्सक व योग तज्ज्ञ डॉ. सुप्रिया चकोले यांनी मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहूनउपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी अत्यंत कठीण वाटणारी योगासने अतिशय सोप्याआणि सहज पद्धतीने करून घेतली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे उपस्थित सर्व अधिकारी, शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनीयोगाचे महत्त्व आत्मसात केले.कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीताने झाली.त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते संत गाडगे बाबा व महर्षि पतंजली यांच्या प्रतिमेचेपूजन करण्यात आले. उपस्थितांचे स्वागत रोपटे देऊन करण्यात आले. कार्यक्रमाचेप्रास्ताविक संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. अनघा देशमुखयांनी, तर आभार प्रदर्शन श्री राजेश पिदडीयांनी करून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज रचित भजन गायीले. हासंपूर्ण सोहळा यशस्वी करण्यासाठी आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील शिक्षक वविद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला विद्यापीठातील शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी, मोठ्या संख्येनेविद्यार्थी आणि अमरावतीमधील योगप्रेमी नागरिक उपस्थित होते.

---

## दर्यापूरच्या राजकारणात खळबळ; शिवसेनेचे माजी उपशहरप्रमुख शादाब सुफी यांचा राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये प्रवेश !

प्रतिनिधी २१ जून

### अल्पसंख्याक सेलच्या शहराध्यक्षपदी नियुक्ती




**दर्यापूर :** दर्यापूरच्या राजकीय वर्तुळात महत्त्वाची घडामोड घडली असून शिवसेना पक्षाचे माजी उपशहरप्रमुख शादाब भाई सुफी यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. प्रवेशानंतर पक्ष नेतृत्वाने त्यांच्यावर विश्वास व्यक्त करत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अल्पसंख्याक सेलच्या दर्यापूर शहराध्यक्षपदाची जबाबदारी सोपविली आहे.

अमरावती येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात ही नियुक्ती जाहीर करण्यात आली. यावेळी पक्षाचे जिल्हाध्यक्ष संतोष महात्मे, अल्पसंख्याक विभागाचे जिल्हाध्यक्ष गुड्डू भाई पठाण, जिल्हा कोषाध्यक्ष प्रविण भुजाडे, तालुका अध्यक्ष निलेश पाटील मोपारी, शहराध्यक्ष अमोल दादा गहरवार, जिल्हा सरचिटणीस कुलदीप पाटील काळे, नगरसेवक राहुल भाऊ बैताडे, माजी जिल्हाध्यक्ष शुभम होले तसेच तालुका अध्यक्ष नितीन गावंडे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

शादाब भाई सुफी हे दर्यापूर शहरातील अल्पसंख्याक समाजात सक्रिय व प्रभावी नेतृत्व म्हणून ओळखले जातात. शिवसेनेत उपशहरप्रमुख म्हणून त्यांनी काम केले असून त्यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील प्रवेशामुळे तालुक्यातील राजकीय समीकरणांमध्ये नव्या चर्चांना उधाण आले आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा प्रवेश राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासाठी मोठे बळ मानला जात आहे.

यावेळी बोलताना पक्ष पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, शादाब भाई सुफी यांच्या प्रवेशामुळे अल्पसंख्याक समाजातील युवक व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी जोडले जातील. तसेच दर्यापूर शहर व तालुक्यात पक्ष संघटना अधिक मजबूत होण्यास मदत होणार आहे. गेल्या काही महिन्यांपासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात विविध स्तरांवरील कार्यकर्त्यांचे इन्कमिंग वाढत असून शादाब भाई सुफी यांचा प्रवेश हा त्याचाच एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

नियुक्तीनंतर शादाब भाई सुफी यांनी पक्ष नेतृत्वाचे आभार मानले.

---

## असोरिया पेट्रोल पंपाजवळ हवेत गोळीबार

प्रतिनिधी २१ जून



**अमरावती:** असोरिया पेट्रोल पंपाजवळ काल रात्री हवेत गोळीबार करण्यात आला. यामुळे शहरात खळबळ उडाली आहे.

जखमी तरुणाची ओळख नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एक तरुण म्हणून पटली आहे. सर्वात वर्दळीच्या भागांपैकी येत असलेल्या असोरिया पेट्रोल पंपाजवळ शनिवारी रात्री उशिरा एक खळबळजनक घटना घडली. अज्ञात हल्लेखोरांनी एका तरुणावर प्राणघातक शस्त्रांनी हल्ला केला. या हल्ल्यात तो तरुण गंभीर जखमी झाला आहे. या घटनेचा संबंध हवेत केलेल्या गोळीबाराशी जोडला जात आहे, ज्यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

हल्लेखोराची ओळख जहीर कॉलनीचा रहिवासी शोएब अहमद एजाज अहमद (३५) अशी पटली आहे. प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, शनिवारी संध्याकाळी शोएब असोरिया पेट्रोल पंपाजवळून जात असताना, आधीच दबा धरून बसलेल्या हल्लेखोरांच्या एका गटाने त्याला घेरले आणि अचानक त्याच्यावर हल्ला केला. हल्लेखोरांनी शोएबला गंभीर जखमी केले. घटनेदरम्यान, परिसरात हवेत गोळीबाराचा आवाज ऐकून घटनास्थळी उपस्थित असलेले लोक हादरले. गोळीबाराची बातमी वाऱ्यासारखी पसरली, ज्यामुळे आजूबाजूच्या परिसरात घबराट पसरली. पोलिसांनी अद्याप गोळीबाराची अधिकृत पुष्टी केली नसली तरी, अफवांमुळे प्रशासनाची चिंता वाढली आहे. हल्ल्यानंतर लगेचच जखमी शोएबला जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच, शोएबच्या कुटुंबीयांची मोठी गर्दी आणि शेकडो समर्थक रुग्णालयाबाहेर जमले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन, ठाणेदार मनोहर कोटनाके आपल्या पथकासह तात्काळ घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी कायदा व सुव्यवस्था राखण्याचे निर्देश दिले. जखमीला प्रथमोपचार दिल्यानंतर, डॉक्टरांनी त्याला चांगल्या उपचारांसाठी एका खाजगी रुग्णालयात पाठवले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तपास सुरू केला आहे. हल्ल्यामुळे घटनास्थळी घबराट पसरली. घटनास्थळी गोळीचे रिकामे कवच सापडल्याने परिस्थितीचे गांभीर्य वाढले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता, डीसीपी श्याम पुगे, गुन्हे शाखेचे पीआय दिनेश पहातोंडे आणि अतुल वर हे पोलीस दलासह घटनास्थळी दाखल झाले. काही संशयितांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांची चौकशी सुरू आहे. परिसरातील तणाव लक्षात घेता पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.

---

## ट्रक चालकाकडून अडत व्यापाऱ्याची १३ लाखांनी फसवणुक प्रकरण उघड

प्रतिनिधी २१ जून



**अमरावती :** ट्रक चालकाने खोटे नाव व क्रमांक देवुन मालवाहु ट्रकद्वारे अडद व्यापा-याची १३,००,०००/- रु. ची केलेल्या फसवणुकीचा गुन्हा गाडगेनगर पोलीसांनी उघड केले.

सदर गुन्हा दाखल होताच पो.स्टे. गाडगेनगर येथील व.पो.नि. गोरखनाथ जाधव सा यांनी डि.बी. पथकाचे प्रमुख पोउपनि योगेश श्रीवास व त्यांचे पथकांतील अंमलदार यांना तात्काळ गुन्हा उघड करण्याचे सुचना देवुन रवाना केले असता त्यांनी तपास करत गुन्हयात वापरलेला ट्रक क्रमांक खोटा असल्याचे निष्पन्न केले तसेच ट्रक चालकाने त्याचे सांगितलेले नाव हे देखील खोटे असल्याचे उघड झाले. सदरचा गुन्हा उघड यावा म्हणुन पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी घटनास्थळावरील सि.सी.टी.व्ही. फुटेज व हायवे रोडवरील टोलनाक्यावरील सि.सि.टी.व्ही. फुटेजची पाहणी करुन संपुर्ण महाराष्ट्रातील अश्या प्रकारचे ठकवणुकीचे गुन्हे करणारे अभिलेखावरील गुन्हेगाराची माहीती काढुन यामधुन अश्याच प्रकारचे बरेच गुन्हे दाखल असलेले आरोपी शिवाजी त्र्यंबक राठोड, रा. बंजारा तांडा, माळकोडी, ता. लोहा, जि. नांदेड व ट्रक मालक, रमेश मिठ्ठ राठोड, रा. शिवाजी नगर बंजारा तांडा, लोहा, जि. नांदेड यांचा शोध घेवुन आरोपी क्रमांक रमेश मिठ्ठ राठोड यास ताब्यात घेवुन सदर गुन्हा अनुषंगाने सखोल विचारपुस केली असता त्याने ट्रक चालक शिवाजी त्र्यंबक राठोड याचे सोबत मिळुन ट्रकवर खोटी नंबर प्लेट लावुन सदरचा गुन्हा केला असल्याचे कबुल केले आहे. त्याने दाखविले प्रमाणे ग्राम फरकांडा, ता. पालम जि. परभणी येथील व्यापारी याचेकडुन त्याने आरोपीकडुन विकत घेतलेला २०० क्विटल सोयाबीन इतर ठिकाणी विकल्याने त्यामध्ये नगदी १२०००००/- रु. पुरावा म्हणुन जप्त करण्यात आले आहे. तसेच आरोपीतांनी गुन्हा करतांना वापरलेला मुळ ट्रक क्रं. Mh40/AK-3811 किं.अं. ८,००,०००/- रु. चा असा एकुण २०,००,०००/- रु. चा माल जप्त करुन सदरचा क्लिष्ट स्वरुपाचा व अत्यंत गुंतागुंतीचा गुन्हा उघडकीस आणला आहे.

---

## अमरावतीच्या पाणीपुरवठ्याचे शिल्पकार होते प्रा. बी. टी. देशमुख- आमदार रवी राणा



महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या एका बैठकीत जुन्या नोंदी पाहताना एक महत्त्वाचा इतिहास समोर आला. तब्बल ३५ वर्षांपूर्वी माजी आमदार प्रा. बी.टी. देशमुख यांच्या सातत्यपूर्ण संघर्षामुळे अप्पर वर्धा प्रकल्पातून अमरावती शहरापर्यंत पाणीपुरवठा करणारी पाइपलाइन मंजूर होऊन तिची अंमलबजावणी सुरू झाली होती. आज अमरावती आणि बडनेरा शहरातील नागरिकांना मुबलक प्रमाणात मिळणारे पाणी हे त्यांच्या दूरदृष्टीचे आणि अथक प्रयत्नांचे फलित आहे. याचा आम्हाला मनापासून अभिमान आहे.

आज अनेक वर्षांनंतर याच योजनेअंतर्गत जुन्या पाइपलाइनच्या जागी नवीन पाइपलाइन टाकण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून सुमारे ८५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून घेण्यात आला आहे. त्यामुळे भविष्यातही शहराचा पाणीपुरवठा अधिक सक्षम आणि शाश्वत होणार आहे.

प्रा. बी. टी. देशमुख हे अत्यंत निष्कलंक, अभ्यासू आणि जनहितासाठी झटणारे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या निधनाने केवळ विदर्भानेच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राने एक मूल्यनिष्ठ आणि लोकहितवादी नेतृत्व गमावले आहे. त्यांच्या कार्याची प्रेरणा पुढील पिढ्यांना सदैव मार्गदर्शक ठरेल.

**- रवी राणा**


अध्यक्ष, आश्वासन समिती,
मुंबई तथा आमदार, बडनेरा
विधानसभा मतदारसंघ

## प्रा. बी.टी. देशमुख यांच्या निधनाने शैक्षणिक क्षेत्राची हानी - कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते



विदर्भ सिंचन अनुशेष निर्मूलनाचे महर्षि, गाढे अभ्यासक तथा माजी विधान परिषद सदस्य प्रा. बी.टी. देशमुख यांचे निधनाप्रसंगी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे शोकसंवेदना व्यक्त करतांना म्हणाले, एका ध्येयवादी शिक्षकापासून ते सलग ३० वर्षे विधान परिषदेत शिक्षकांचे आणि विदर्भाचे प्रतिनिधित्व करणारे झुंझार लोकप्रतिनिधी असा प्रा. बी.टी. देशमुख यांचा प्रवास थक्क करणारा आहे. सभागृहाचा सर्वोच्च तांत्रिक अभ्यास, कायद्याची अचूक जाण, आकडेवारीचा सखोल व्यासंग आणि संयत मांडणी यामुळे त्यांनी विधिमंडळात स्वतःचा एक वेगळाच दरारा निर्माण केला होता. सभागृहाचा चालता-बोलता नियमसंग्रह अशी त्यांची ख्याती होती. सभागृहाचे सभापती म्हणून सुद्धा त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. अमरावती विद्यापीठ व डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोलाच्या स्थापनेत त्यांचे महत्वपूर्ण योगदान होते.

प्रा.बी.टी. देशमुख यांचा जन्म अत्यंत सामान्य कुटुंबात झाला. गरिबी आणि संघर्षाचे चटके सोसत त्यांनी आपले उच्च शिक्षण पूर्ण केले. प्रा.बी.टी. देशमुख हे जरी पदवीधर आमदार असले, तरी त्यांचे कार्य केवळ शैक्षणिक क्षेत्रापुरतेच मर्यादित नव्हते. विदर्भावर होणाऱ्या आर्थिक आणि प्रादेशिक अन्यायाची त्यांना तीव्र जाणीव होती. दांडेकर समिती आणि केळकर समितीच्या अहवालांचा सखोल अभ्यास करून त्यांनी विदर्भाच्या सिंचनाचा आणि विकासकामांचा हजारो कोटी रूपयांचा अनुशेष राज्य सरकारच्या डोळ्यात अंजन घालून दाखवून दिला. अमरावती शहरासह अन्य शेकडो गावांची तृष्णातृप्ती करणारे अप्पर वर्धा धरणाच्या निर्मितीत त्यांचे महत्वपूर्ण योगदान राहिले असून पेढी धरणासाठी त्यांचा आग्रह होता. त्यांच्या अभ्यासू मांडणीमुळे सरकारला अनेकदा विदर्भासाठी विशेष निधीची घोषणा करावी लागली होती. कुलगुरू पुढे म्हणाले, ३० वर्षे आमदारकी भूषवूनही त्यांच्या राहणीमानात कधीही बदल झाला नाही. अमरावतीतील त्यांचे घर आणि राहणे अत्यंत साधे होते. आपल्या आमदार निधीचा एक-एक रूपया कुठे आणि कसा खर्च झाला, याचा हिशोब ते दरवर्षी पुस्तिकेच्या माध्यमातून जनतेसमोर मांडायचे, अशी पारदर्शकता ठेवणारे लोकप्रतिनिधी आज दुर्मिळ झाले आहेत. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या विकासाच्या जडणघडणीत त्यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे. विद्यापीठाच्या सर्वच प्राधिकरणांवर त्यांनी कार्य करून विद्यापीठाची ध्येयधोरणे ठरविण्यामध्ये आपले मोलाचे मार्गदर्शन दिले आहे.



प्रा. बी.टी. देशमुख यांचे दुःखद निधनाने त्यांच्या कुटुंबियांवर जो दुःखाचा डोंगर कोसळला, ते दुःख सहन करण्याची शक्ती ईश्वर त्यांना देवो आणि स्व.बी.टी. देशमुख यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, अशी ईश्वरचरणी सामुहिक प्रार्थना करुन त्यांना विद्यापीठातर्फे त्यांना विनम्र श्रध्दांजली अर्पण करतो.

राजकीय ॲक्टर,
स्त्रीभ्रूणहत्येचा फॅक्टर,
अविवेकी डॉक्टर ,
बोगस कॅरेक्टर...




# स्त्रीभृणहत्या प्रकरणी कारवाई थातूर - मातूर... अधिकारी चतूर, पोलीस फितूर !



## * मोबाईल लोकेशन शोधा, आरोपीला अटक करा, जनतेची मागणी

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

मालेगाव येथील आरोग्य विभागाच्या वैद्यकीय अधीक्षकांनी राजाश्रय असलेल्या सत्ताधारी पक्षाच्या 'निष्ठा' वान कार्यकर्ता असलेल्या अविवेकी डॉक्टरच्या बेकायदेशीररित्या गर्भ लिंग निदान चाचणीसह स्त्री भ्रूण हत्या करणाऱ्या कथित सोनोग्राफी सेंटर वर 'सिंघम' स्टाईल धाडसी कारवाई करून अविवेकी दाम्पत्याचे काळे कारनामे उघडकीस आणून स्वतःची पाठ थोपटून घेतली आहे. परंतु ही धडाकेबाज कारवाई करतांना अविवेकी डॉक्टरच्या डॉक्टर असलेल्या आणि अविवेकी डॉक्टरच्या प्रत्येक पापात सहभागी असलेल्या 'पुरोगामी' पत्नीचे नाव 'ज्ञात' असूनही तक्रार देतांना 'अज्ञात' महिला डॉक्टर असा उल्लेख केल्याने आरोग्य व पोलीस प्रशासनाच्या कार्यप्रणालीबाबत परिसरात उलटसुलट चर्चेला उधाण आले आहे. आरोपी बेंगलोरला फरार झाल्याची माहिती असून आरोपीचे मोबाईल लोकेशन शोधून अटक करण्याची मागणी होत आहे.




दोन आठवड्यापुर्वी मालेगाव नगरीत जगजाहीर झालेल्या अविवेकी डॉक्टरच्या माने हॉस्पीटल मध्ये खुलेआम सुरू असलेल्या बेकायदेशीर गर्भ लिंग निदान चाचणीसह स्त्री भ्रूण हत्या करणाऱ्या सोनोग्राफी सेंटरवर बोगस गर्भवती असलेल्या महिलेस पाठवून आरोग्य विभागाने टाकलेल्या कारवाईत माने दाम्पत्यासह काही दलालांची नावे समोर आलीत. आरोग्य विभागाचे वैद्यकीय अधीक्षक व त्यांची टीम ही धडाकेबाज कारवाई करण्यासाठी माने हॉस्पीटल मध्ये गेले असता त्यांनी समोरच्या दरवाजाने प्रवेश केला. माने दाम्पत्यावर कारवाईची 'विज' कोसळणार असल्याची चाहूल लागताच 'या' बेकायदेशीर कृत्यात सहभागी असलेले सर्व 'ज्ञात' आरोपी मागील दरवाजाने फरार झाल्याची चर्चा आहे. या काळ्या कृत्यात सदैव सहभागी असलेल्या अविवेकी डॉक्टरच्या 'पुरोगामी' विचाराच्या डॉक्टर असलेल्या पत्नीचे नाव सर्वांना ज्ञात असताना या प्रकरणात अज्ञात महिला डॉक्टर असा जाणूनबुजून उल्लेख केल्याची परिसरात चर्चा आहे. तर आरोपी बेंगलोरला फरार झाल्याची चर्चाही मालेगाव शहरात होत आहे. तर पोलिस आरोपीला पाठीशी घालत आहेत. त्यामुळे आरोपीचे मोबाईल लोकेशन शोधावे आरोपीला अटक करावे, अशी मागणी जनतेतून होत आहे. आता या प्रकरणाचा सखोल तपास करण्यासाठी मालेगाव पोलीस असमर्थ असतील तर पोलीस अधीक्षकांनी समर्थ असलेल्या एलसीबी कडे तपास सुपूर्द करून या महापापात सहभागी असलेल्या सर्व आरोपींना गजाआड करण्यासाठी पुढाकार घेण्याची मागणी विविध स्तरातून केल्या जात आहे.




## थोडक्यात

### महावितरण वाशिम येथे रक्तदान शिबीर संपन्न!




●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

पंतप्रधान मा.नरेन्द्र मोदीजी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, महाराष्ट्र राज्य यांनी आपला २१ वा वर्धापण दिवस कुठला ही बडेजाव न करता अत्यंत साधेपणाने अतिरिक्त खर्च न करता संपूर्ण महाराष्ट्रभर साजरा केला. त्याच अनुषंगाने महावितरण मंडळ कार्यालय,वाशिम येथे रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

शिबीराचे उद्घाटन मा.संदिप दरवाडे (अधिक्षक अभियंता) यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थिती मा.सोमनाथ मठपती (कार्यकारी अभियंता) मा.सुनिल पाठक (व्यवस्थापक) मा.रमेश घुगे (उपव्यवस्थापक) यांचेसह बहूसंख्य कर्मचारी हजर होते.यावेळी रक्तदान करणे व करवून घेणे का गरजेचे आहे याबाबत राजेश उर्फ जी.व्ही. भारस्कर (रक्तदाता तथा सामाजिक कार्यकर्ता) यांनी मार्गदर्शन करुन प्रत्येक निरोगी व्यक्तीने किमान वर्षात एकदा तरी रक्तदान करुन गरजू रुग्नांना रक्तपुरवठा करण्यात मदत करुन आपले राष्ट्रीय तथा सामाजिक दायित्व पूर्ण करावे असे आवाहन केले.रक्तदान शिबीरात दिपक तुरुकमाने, गणेश घुगे,कांतीलाल सुंडेवाले निलेश देशमुख,विलास धामनकर,सलोनी पांडे, संतोष जामनिक,राजू तिरके, राजेश उर्फ जी.व्ही.भारस्कर, रविन्द्र खाडे,सुनिल पाटील आदिंनी रक्तदान केले. रक्तदान शिबीर यशस्वी करणेकरीता निलेश घुगे,राम कुटे, सलीम खान,विलास गायकवाड यांचेसह इतरांनी सहकार्य केले.शासकीय ब्लड बॅंक,वाशिम चमूच्या डॉ.राखी काळबांधे (बी टी ओ) एस.एस.स्वामी (रक्तपेढी तंत्रज्ञ) यांचेसह राजकुमार पवार,दत्ताजी कागणे, प्रियंका सावंत, सुनिल सावके यांनी रक्त संकलन करुन शासकीय रक्तपेढीत जमा केले.

# द्वारपोच योजनेतील 'महसूल घोटाळ्या'ची अखेर दखल विभागीय आयुक्तांचे चौकशी आदेश, पुरवठा विभागात खळबळ !

●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●


जिल्ह्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या द्वारपोच धान्य वाहतूक योजनेत लाखो रुपयांचा महसूल बुडविण्यात आल्याचा गंभीर आरोप आता केवळ आरोपांच्या पातळीवर राहिलेला नाही. या प्रकरणाची दखल थेट विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांनी घेतल्याने संपूर्ण पुरवठा यंत्रणेत खळबळ उडाली आहे. सातत्याने केलेल्या निवेदनांचा, आंदोलनांचा आणि पाठपुराव्याचा परिणाम म्हणून आता या कथित गैरव्यवहाराची अधिकृत चौकशी सुरू होण्याचे संकेत मिळाले आहेत.





विकास दभाडे यांनी विभागीय आयुक्तांकडे सादर केलेल्या निवेदनात सन २०२० पासून शासकीय धान्य वाहतुकीसाठी नियुक्त काही ठेकेदारांकडून शासनाच्या नियमांचे उल्लंघन करून मोठ्या प्रमाणावर महसूल बुडविण्यात आल्याचा आरोप केला आहे. यासंदर्भात अनेक वेळा स्थानिक प्रशासन, पुरवठा विभाग आणि महसूल यंत्रणेकडे तक्रारी करूनही कोणतीही प्रभावी कारवाई झाली नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. नेमके आरोप काय? निवेदनात उपस्थित करण्यात आलेले प्रश्न अत्यंत गंभीर स्वरूपाचे आहेत. शासकीय धान्य वाहतुकीसाठी वापरण्यात आलेल्या वाहनांचा वार्षिक कर भरला गेला होता की नाही? संबंधित वाहनांवर शासनाने निर्धारित केलेले फलक लावण्यात आले होते का? वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली वाहने प्रत्यक्षात कोणाच्या मालकीची होती? त्यांची अधिकृत नोंद ठेवण्यात आली होती का? तसेच शासन आणि ठेकेदार यांच्यात झालेल्या करारातील अटींचे पालन करण्यात आले का? अशा अनेक मुद्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, या सर्व बाबींची पडताळणी करणे ही संबंधित निरीक्षक व प्रशासकीय यंत्रणेची जबाबदारी असताना त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले का, असा सवालही निवेदनातून उपस्थित करण्यात आला आहे. आंदोलने झाली, आश्वासने मिळाली; पण कारवाई शून्य! या प्रकरणात प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी अनेक वेळा आंदोलने करण्यात आल्याचे सांगितले जाते. निवेदनानुसार, २९ जुलै २०२५ रोजीही आंदोलन छेडण्यात आले होते. त्यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी एका महिन्यात चौकशी करून कारवाई करण्याचे लेखी आश्वासन दिल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र त्यानंतरही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने संशय अधिकच बळावला. प्रशासनाच्या या कथित निष्क्रियतेमुळेच अखेर हे प्रकरण विभागीय आयुक्तांपर्यंत पोहोचले. यानंतर अमरावती येथील विभागीय आयुक्त कार्यालयाने तत्काळ दखल घेत जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना चौकशीचे आदेश जारी केले.

# भंगार गाड्या बेधडक धावतात, अधिकारी मात्र डोळेझाक करतात!



● खाजा शेख @ रिसोड●

रिसोड शहर व परिसरात भंगार अवस्थेतील प्रवासी वाहनांचा सुळसुळाट वाढला असून नागरिकांच्या जीवाशी सर्रास खेळ सुरू असल्याचे चित्र आहे. अनेक वाहनांची अवस्था अत्यंत जीर्ण झाली असून ब्रेक, टायर, सस्पेन्शन आणि इतर यांत्रिक भागांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. मात्र, तरीही ही वाहने भरधाव वेगाने रस्त्यांवर धावताना दिसत आहेत.




नागरिकांच्या म्हणण्यानुसार, काही वाहनांमध्ये क्षमतेपेक्षा अनेक पटीने जास्त प्रवासी कोंबले जातात. अनेकदा प्रवासी वाहनांच्या मागे लटकून जीव मुठीत धरून प्रवास करताना दिसतात. त्यामुळे मोठ्या दुर्घटनेचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे.

रिसोड पोलिसांची धडाकेबाज कारवाई...

# तलवार, लायटर पिस्टलसह लाखोंचा मुद्देमाल जप्त

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड●

रिसोड पोलीस स्टेशनच्या डी.बी. पथकाने मध्यरात्री संशयास्पदरीत्या वावरणाऱ्या तीन इसमांवर धाडसी कारवाई करत धारदार तलवार, लायटर पिस्टल, मोबाईल व मोटारसायकलसह सुमारे १ लाख ७ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत एका संशयितास अटक करण्यात आली असून दोन जण फरार झाले आहेत.



पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, १८ जून रोजी पहाटे १ वाजण्याच्या सुमारास वाशिम नाका परिसरातील मुंदडा कॉम्प्लेक्समध्ये तीन इसम धारदार शस्त्रांसह अंधारात संशयास्पदरीत्या बसल्याची माहिती डी.बी. पथकाला मिळाली. त्यानुसार पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पोलीसांनी सापळा रचत संशयितांचा पाठलाग केला असता त्यांनी पळ काढण्याचा प्रयत्न केला. त्यापैकी शामराव शिवाजी काळे (वय २४, रा. साकला प्लॉट, परभणी) यास ताब्यात घेण्यात आले, तर त्याचे दोन साथीदार पसार झाले. झडतीदरम्यान आरोपीकडून एक लोखंडी तलवार, स्टील कटर, व्हिवो कंपनीचा मोबाईल व पल्सर एनएस-१२५ मोटारसायकल जप्त करण्यात आली. तसेच घटनास्थळावरून फरार आरोपींची एक फायबरची लायटर पिस्टल व ओप्पो कंपनीचा मोबाईलही हस्तगत करण्यात आला. चौकशीदरम्यान फरार आरोपींची नावे अनिल उत्तम काळे (रा. परभणी) व रमेश किसन काळे (रा. निजामपूर, रिसोड) अशी असल्याचे समोर आले. तिघेही एखादा दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने तेथे थांबले असल्याचा संशय असून, अटक आरोपीकडे बेकायदेशीररित्या तलवार आढळून आल्याने त्याच्यासह इतर आरोपींविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १२२ तसेच आर्म्स ॲक्ट कलम ४, २५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील, अपर पोलीस अधीक्षक लता फड आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक नवदिप अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वात डी.बी. पथकाने केली.

# रोटरी क्लबचा पदग्रहण सोहळा

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

रोटरी इंटरनॅशनल क्लबच्या वाशिम शाखेचा नूतन पदग्रहण सोहळा येथील हॉटेल 'मनीप्रभा' मध्ये मोठ्या उत्साहात व मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. 'वाशिम जिल्ह्यातील नागरिक, महिला आणि युवक-युवतींच्या सक्षमीकरणासाठी, तसेच समाजाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी रोटरी क्लब विविध कल्याणकारी उपक्रम प्रभावीपणे राबविण्यास कायम कटिबद्ध राहील,' अशी ग्वाही रोटरीचे प्रांतपाल (ॲंगू उदनेहदे) रोटेरियन ज्ञानेश्वर शेवाळे यांनी या प्रसंगी दिली.

रोटरी क्लब ऑफ पुसदचे अध्यक्ष श्रीराम पदमवार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले, तर पुसदचे माजी अध्यक्ष रोटेरियन डॉ. उमेश रेवणवार यांनी मुख्य अतिथी प्रांतपाल ज्ञानेश्वर शेवाळे यांचा परिचय करून देत नवीन सदस्यांना रोटरीच्या गौरवशाली इतिहासाची माहिती दिली या दिमाखदार सोहळ्यात वाशिम रोटरी क्लबच्या नवनियुक्त कार्यकारिणीचा पदभार सोपविण्यात आला. नवनियुक्त अध्यक्ष डॉ. रवींद्र मडावी यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते रोटरीचे मानाचे 'चार्टर, पिन, कॉलर आणि प्रशस्तीपत्र' देऊन अध्यक्षपदाची सूत्रे अधिकृतपणे सुपूर्द करण्यात आली. तसेच नवनियुक्त सचिव रोटेरियन डॉ. प्रशांत बुकने यांना प्रांतपालांच्या हस्ते पिन व कॉलर परिधान करून सचिवपदाची धुरा देण्यात आली. याप्रसंगी वाशिम रोटरी क्लबचे नूतन सदस्य म्हणून जिल्ह्यातील विविध क्षेत्रांतील नामांकित व्यक्तींनी रोटरीत अधिकृत प्रवेश केला. यामध्ये डॉ. अतुल राऊत, डॉ. संघरक्षित भदरगे, डॉ. अरविंद बोहरपी, डॉ. प्रसेनजित चिखलीकर, डॉ. पंढरी गोरे, डॉ. पौर्णिमा संधानी, डॉ. संजय साळवे, डॉ. विजय गावंडे, प्रा. उद्धव बनकर, प्रा. सचिन इंगोले, प्रा. ज्ञानेश्वर गोरे, मयूर हुमाने, आशिष भास्कर, सुनील सुर्वे, प्रदीप गोटे, राम लहाने आणि युवराज राठोड या सर्व नवनियुक्त सदस्यांना रोटरी पिन आणि प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. या सोहळ्याला अकोला येथील रोटेरियन ए.जी. घोडके, सहाय्यक गव्हर्नर सुधाकर ठाकरे, पुसद रोटरी क्लबचे अध्यक्ष श्रीराम पद्मावार, डॉ. विश्वास डांगे आणि डॉ. उमेश रेवणवार यांच्यासह जिल्ह्यातील रोटरीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे अत्यंत नेटके आणि प्रभावी सूत्रसंचालन युवराज राठोड यांनी केले, तर उपस्थितांचे आभार राम लहाने यांनी मानले. उपस्थितांच्या प्रचंड उत्साहात राष्ट्रगीताने या दिमाखदार सोहळ्याची सांगता झाली.







# खा. संजय देशमुख यांच्या कार्यालयाला देणार संरक्षण- रविभाऊ भांदुर्गे

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

आताच झालेल्या ऑपरेशन टायगर अंतर्गत राज्यातील सात खासदार उद्धव ठाकरे यांची शिवसेना सोडून शिंदेंसेनेत प्रवेश केला आहे.मतदान संघातील जनतेचा विकास करण्यासाठी व मतदान संघात विकासकामे खेचून आणण्यासाठी सत्ताधारी पक्ष अतिशय महत्त्वाचा असतो त्याचाच धागा पकडून या सहा खासदारांनी सत्ताधारी पक्षात प्रवेश केला आहे त्या पार्श्वभूमीवर वाशिम जिल्ह्यातील काही उद्धव सेनेतील कार्यकर्त्यांनी समाजमाध्यमावर खासदार यांना धमक्या दिल्याचे आपण पाहत आहे.त्यांच्या विरोधात आंदोलन करून आपला राग व्यक्त करत आहेत काहींनी तर त्यांचे कार्यालय फोडून टाकणे त्यांना वाशिम शहरात प्रवेश करू न देणे अशा प्रकारच्या धमक्या दिल्या आहेत त्या पार्श्वभूमीवर युवासेनेचे जिल्हाप्रमुख रवीभाऊ भांदुर्गे, गजानन ठेंगडे, चेतन इंगोले, श्याम तिवारी, संतोष व्यास, रामेश्वर राऊत आणि त्यांचे सर्व युवा सैनिक मा. खासदार संजय भाऊ देशमुख यांना व त्यांच्या कार्यालयाला संरक्षण देणार आहेत त्यांनी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत प्रवेश केला म्हणजे ते आपले खासदार आहेत आणि मा. खासदार श्रीकांत शिंदे व पूर्वेश सरनाईक यांचे निर्देश शिरसावंद्य म्हणून त्यांचे वाशिम जिल्ह्यात आल्यावर त्यांचे पुर्ण संरक्षण करण्याची जबाबदारी युवासेना प्रमुख रवी भाऊ भांदुर्गे आणि त्यांच्या सर्व युवासैनिकांनी घेतली आहे.



ज्या दिवशी खासदार संजय देशमुख व त्यांच्या सोबत ५ खासदारांनी मा एकनाथजी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेचे प्रवेश घेतला त्या दिवशी ते आमचे नेते आहेत हे मानून व खासदार श्रीकांत शिंदे व पूर्वेश सरनाईक यांचे कडवट शिवसैनिक या नात्याने आम्ही कोणत्याही धमकीला न घाबरता त्याच्या वाशिम जिल्ह्यात प्रवेश होताच आम्ही सर्व युवा सैनिक त्यांचे संरक्षण करणार असून त्यांच्या कार्यालयाकडे कोणी फिरकुन ही पाहणार नसून तशा प्रकारचा बंदोबस्त आम्ही शिवसैनिक करणार आहोत.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा

रविवार, दि. २१ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# लोखंडी रॉडने हल्ला; चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

**खामगाव:** नांदुरा तालुक्यातील नायगाव येथे किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून एका व्यक्तीवर लोखंडी रॉडने हल्ला करण्यात आल्याची घटना रात्री घडली. तक्रारीनुसार, आरोपींनी संगनमत करून फिर्यादीशी वाद घातला. यावेळी आरोपी महेंद्र सपकाळ याने दारूच्या नशेत लोखंडी रॉडने फिर्यादीच्या डोक्यावर वार करून त्यांना जखमी केले. तसेच इतर आरोपींनी शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप तक्रारीत तक्रारदार संतोष प्रल्हाद सपकाळ (३२) रा. नायगाव, ता. नांदुरा यांनी केला. त्यावरून नांदुरा पोलिस ठाण्यात महेंद्र देविदास सपकाळ, भगीरती सपकाळ, रविंद्र सपकाळ व राजरत्न रविंद्र सपकाळ (सर्व रा. नायगाव, ता. नांदुरा) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ३५१(२), ३५१(३) व ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल चिखलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# रिक्त शिक्षकपदांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान

## जिल्हा परिषद हायस्कूल, आसलगांव बाजार येथील वास्तव

प्रतिनिधी २१ जून




**जळगाव जामोद:** तालुक्यातील आसलगाव येथील पीएम श्री जिल्हा परिषद शाळेत शिक्षकांची कमतरता असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर गंभीर परिणाम होत असल्याची तक्रार पालक व शिक्षण समिती व ग्रामस्थांकडून वारंवार करण्यात येत आहे.

विद्यार्थ्यांची संख्या जास्त असताना उपलब्ध शिक्षकांची संख्या अपुरी असल्याने अनेक वर्गाचे अध्यापन नियमितपणे होत नसल्याचे समोर आले आहे. त्यामध्ये रिक्त पद मुख्याध्यापक एक वर्ग ९ ते १० पाच वर्ग सहा ते आठ एक असे एकूण सात पदे रिक्त आहेत. शाळा समिती व ग्रामस्थांकडून शिक्षकांची मागणी होऊन सुद्धा शिक्षकांची पूर्तता अद्याप पर्यंत करण्यात आली नाही. विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक मार्गदर्शन मिळत नाही. परिणामी अभ्यासक्रम पूर्ण होण्यास विलंब होत असून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर ही परिणाम होत आहे. विशेषता इयत्ता नववी ते दहावी विद्यार्थ्यांच्या मूलभूत शैक्षणिक कौशल्यावर याचा विपरीत परिणाम होत असल्याचे चिंता व्यक्त केली जात आहे आसलगाव जिल्हा परिषद शाळा यापूर्वी विविध शैक्षणिक उपक्रमामुळे चर्चेत राहिली आहे.

या जिल्हा परिषद हायस्कूल ने उच्चस्पद अधिकारी, डॉक्टर, इंजिनीयर, मोठमोठे व्यापारी तसेच खेळाडू सुद्धा घडवले आहेत. मात्र शिक्षकांच्या अपुऱ्या संख्येमुळे शैक्षणिक गुणवत्ता टिकून ठेवण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे. शाळा शिक्षण समिती तसेच पालक वर्ग व ग्रामस्थांनी वारंवार शिक्षण विभागाकडे निवेदन देऊन रिक्त पदे तातडीने भरण्याची मागणी केली तरीसुद्धा शिक्षक उपलब्ध करून देण्यास शिक्षण विभाग असमर्थ ठरला आहे याकडे संबंधित प्रशासनांने यावेळी गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांची नियमित उपस्थिती व गुणवत्तापूर्ण शिक्षण ही शासनाच्या प्राथमिक उद्दिष्टे पैकी एक असल्याचे शिक्षण विभागाच्या योजनांमध्ये नमूद करण्यात आले आहे. शाळा सुरू होण्याच्या सुरुवातीला रिक्त असलेल्या शिक्षकांची पदे त्वरित भरावी अशी मागणी शाळा समिती पालक वर्ग व ग्रामस्थांकडून जोर धरत आहे.

# घटनात्मक हक्काच्या संरक्षणासाठी सोमवारी निषेध मोर्चा

प्रतिनिधी २१ जून

**खामगाव:** अनुसूचित जाती आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या प्रस्तावित प्रक्रिये विरोधात शहरात सोमवारी, २२ जून रोजी निषेध मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. आरक्षणाचे वर्गीकरण केल्यास अनुसूचित जाती समाजात मतभेद निर्माण होऊन सामाजिक ऐक्याला तडा जाऊ शकतो, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली आहे. सामाजिक न्याय आणि घटनात्मक हक्कांच्या संरक्षणासाठी हा मोर्चा काढण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले घटनात्मक आरक्षण हे वंचित समाजाच्या उन्नतीचे प्रभावी साधन असून त्यात विभागणी करण्याचा कोणताही प्रयत्न सामाजिक न्यायाच्या तत्त्वांना बाधा पोहोचवणारा ठरू शकतो, अशी भावना समाजातील विविध घटकांकडून व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आणि समाजाची भूमिका स्पष्ट करण्यासाठी हे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. मोर्चाची सुरुवात शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती स्मारक येथून सकाळी ११ वाजता होणार असून तो उपविभागीय अधिकारी कार्यालयावर धडकणार आहे. यावेळी शासनाला निवेदन सादर करून आरक्षणाच्या उपवर्गीकरणास विरोध दर्शविण्यात येणार आहे. या आंदोलनात विविध सामाजिक संघटना, युवक, महिला, विद्यार्थी, कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते तसेच अनुसूचित जाती समाजातील विविध घटक मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याचे सांगण्यात आले. समाजातील एकता कायम ठेवण्यासाठी आणि घटनात्मक अधिकारांच्या संरक्षणासाठी सर्वांनी या मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# ग्रा.पं.कडून सादर जन्ममृत्यूचे प्रस्तावच ग्राह्य : तहसिलमध्ये ८० प्रस्ताव पडून

प्रतिनिधी २१ जून

**सोनाळा:** माहे आगष्ट २५ ते एप्रिल २६ पर्यंत जन्ममृत्यू प्रमाणपत्रासाठी १२९ प्रस्ताव दाखल करण्यात आले होते. मात्र यावर कुठलाही निर्णय घेण्यात आला नाही. शासनाने यासाठी १२ मार्च २०२६ रोजी नविन जी आर काढला. त्यानुसार जन्ममृत्यू प्रमाणपत्र प्रस्ताव हे स्थानिक ग्रामपंचायतकडून रितसर तहसिल कार्यालयात सादर करणे बंधनकारक आहे. त्यामुळे तहसिल येथे ८० प्रस्ताव पडून असल्याचे समोर आले आहे. केवळ ४९ प्रस्ताव परत देण्यात आले आहेत. परिणामी संग्रामपूर तालुक्यात जन्ममृत्यू दाखले अडकले असल्याने विद्यार्थी व पाल्य अडचणीत आले आहेत. त्यामुळे जन्ममृत्यू दाखल्यांचा प्रशासन तिढा सोडवावा. अशी मागणी होत आहे.

संग्रामपूर तहसिल कार्यालयात जन्म मृत्यू नोंदीचे प्रकरणी 'येरझारा 'आता जड झाल्या आहेत. परिणामी विद्यार्थी तालुक्यातील गरजू रहिवाश्यांना नाहक त्रास सहन लागत आहे. व शासनाच्या सर्व बाबीची पूर्तता करून वकीलांमार्फत तहसिलला प्रस्ताव सादर करण्यात आले होते. मात्र प्रस्ताव हे स्थानिक प्राधिकरण म्हणजे गावच्या ग्रामपंचायत अथवा नगर पंचायत असेल तर त्यांचेकडूनच संपूर्ण पुराव्यासह प्रस्ताव तहसिलकडे पाठवणे बंधनकारक आहे. असे तहसिल प्रशासनाचे म्हणणे आहे. त्यासाठी संबंधीत वकीलांना याबाबत अवगत करण्यात आले. त्यामुळे ४९ प्रस्ताव परत देण्यात आले. तर ८० प्रस्ताव पडून असल्याने आता नव्याने जन्ममृत्यू दाखले जारी झाले नाही. याला जबाबदार कोण? असा सवाल विचारण्यात येत आहे. दरम्यान आधी नायब तहसिलदार यांच्या आदेशावर नोंद करण्यात आलेल्या संग्रामपूर तालुक्यातील ४१३ जन्ममृत्यूच्या नोंदी रद्द करण्यात आल्याचे समोर आले आहे. नागरिकां नी जन्म मृत्यू नोंद प्रमाणपत्र मिळण्यासाठी तहसीलदार यांच्याकडे अर्ज दाखल केले होते. मात्र याबाबत आदेश तहसीलदार यांनी न देता नायबतहसीलदार यांनी दिले. कार्यालयीन चुकीचा फटका मात्र सामान्य नागरिकांना झाला. जन्म-मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळवण्यासाठी नवीन अटी व शर्तीविषयीचा महत्त्वपूर्ण शासन निर्णय १२ मार्च २०२६ रोजी जारी करण्यात आला. त्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने केंद्र सरकारच्या जन्म-मृत्यू नोंदणी (सुधारणा) अधिनियम, २०२३ चा आधार घेऊन ही नवीन कार्यपद्धती निश्चित केली आहे. त्यानुसार प्रस्ताव ग्रा.पं. जन्म मृत्यू निबंधक तथा ग्रामसेवक यांचेकडून तहसिलकडे सादर होणे गरजेचे आहे. जन्मप्रमानपत्र रद्द झालेल्या बऱ्याच नागरिकांनी व ज्यांना गरज आहे. अशा इतर नागरिकांनी शासन निर्णयानुसार जन्मप्रमाणपत्र मिळविण्यासाठी कागदपत्र पूर्तता करून तहसीलदार संग्रामपूर यांच्याकडे प्रकरण सादर केले आहे.

# हिंदूसूर्य महाराणा प्रतापसिंह जयंतीनिमित्त माजी आ. राणा दिलीपकुमार सानंदा यांच्या हस्ते सामान्य रुग्णालय येथे फळ व भोजन वाटप

प्रतिनिधी २१ जून



**खामगाव :** हिंदवी स्वराज्याच्या शौर्य, स्वाभिमान आणि त्यागाचे प्रतीक असलेले हिंदूसूर्य महाराणा प्रतापसिंह यांची तिथीनुसार ४८६ वी जयंती बुधवार दि. १७ जून २०२६ रोजी खामगाव शहरामध्ये उत्साहात साजरी करण्यात आली. महाराणा प्रतापसिंह जयंतीनिमित्त माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांच्या हस्ते सामान्य रुग्णालयातील लॉयन्स क्लब संस्कृती खामगावच्या अन्नछत्रामध्ये रुग्णांच्या नातेवाईकांना भोजन वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेसच्या शहरअध्यक्षा श्रीमती सरस्वतीताई खासने, तालुका अध्यक्ष मनोज वानखडे, शहर उपाध्यक्ष नरहरी टिकार, मुन्नासिंह राजपुत, दुर्गासिंह ठाकुर, सुभाषसिंह ठाकुर, ईश्वर राणा, बाजार समितीचे संचालक विलाससिंग इंगळे, विजय काटोले, केशव कापले, रोहितसिंह राजपुत आदींची प्रमुख उपस्थिती होती.

लॉयन्स क्लब संस्कृती खामगावच्या माध्यमातून सुरेशचंद्र अग्रवाल यांच्या संकल्प आणि प्रेरणेतुन मागील ६ वर्षापासुन सामान्य रुग्णालयामध्ये रुग्णांच्या नातेवाईकांना निःशुल्क भोजन वाटपाचा स्तुत्य उपक्रम निरंतरपणे सुरु असुन यामध्ये एकही दिवस खंड पडलेला नाही. हा उपक्रम राबविण्यासाठी लॉयन्स क्लब संस्कृती खामगावचे पदाधिकारी व सदस्य परिश्रम घेत आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते तथा माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल असलेल्या रुग्णांच्या नातेवाईकांना भोजन वाटप करण्यात आले. या अन्नदान उपक्रमामध्ये पोळी-भाजी, मसाला भात तसेच बिस्कीट पुड्यांचे वितरण करण्यात आले. यावेळी बोलतांना माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा म्हणाले की, महाराणा प्रताप यांच्या जयंतीनिमित्त समाजातील गरजू व गरजवंत घटकांच्या सेवेसाठी योगदान देणे हीच त्यांना खरी आदरांजली आहे. अश्या सामाजिक उपक्रमातुन मानवता आणि परोपकाराची भावना जोपासत सामाजिक बांधिलकी जपली जात असल्याचेही त्यांनी सांगितले. तद्नंतर महाराणा प्रतापसिंह जयंतीनिमित्त सामान्य रुग्णालयातील रुग्णांना माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांच्या हस्ते फळ व बिस्कीटांचे वाटप करण्यात आले. यावेळी माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी रुग्णांच्या प्रकृतीची आस्थेने विचारपूस केली. या कार्यक्रमाला आकाश घोडके, अशोकबाप्पु देशमुख, गणेश पाटील, मुकुंदसिंग इंगळे, गणेश ताले, अन्सार भाई, सनी ससाने, तुषार राजपुत, मोहित पवार, अभिषेक सोळंके, गजानन बगाडे, अमोल राणा, आदित्य पवार, मोहनसिंग सिसोदिया, अभिजीत राजपुत, अभिजीत बोराडे यांच्यासह राजपुत समाज बांधव व लॉयन्स क्लब संस्कृती खामगावचे पदाधिकारी उपस्थित होते.

# मोटारसायकल चोरट्यास २४ तासांत अटक

प्रतिनिधी २१ जून



**चिखली:** शहरातील बसस्थानक परिसरातून चोरीस गेलेली मोटारसायकल अवघ्या २४ तासांत शोधून काढत चिखली पोलिसांच्या डी. बी. पथकाने आरोपीला अटक केली. या कारवाईत मोटारसायकलही चोरीची जप्त करण्यात आली आहे. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, साखरखेर्डा येथील सुभाष पांडुरंग सुसते यांनी दिलेल्या तक्रारीवरून चिखली पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. फिर्यादी यांनी ४ जून २०२६ रोजी त्यांची हीरो एचएफ डिलक्स (क्र. एमएच २८ बीएम ३९१३) ही सुमारे ४८ हजार रुपये किंमतीची मोटारसायकल चिखली बसस्थानका जवळील देशी दारू गल्लीतील न्हाव्याच्या दुकानासमोर उभी केली होती. काही वेळाने परत आल्यावर मोटारसायकल आढळून न आल्याने चोरी झाल्याचे स्पष्ट झाले.

या प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. तपासाची जबाबदारी पोलीस नाईक अमोल गवई यांच्याकडे सोपविण्यात आली.

पोलीस निरीक्षक भूषण गावंडे यांच्या मार्गदर्शनाखाली डी. बी. पथकाने तपास सुरू केला असता गुप्त माहितीच्या आधारे आरोपी मेहकर येथील असल्याचे निष्पन्न झाले. पुढील तपासादरम्यान आरोपी चोरीची मोटारसायकल घेऊन मेहकरहून चिखली कडे येत असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली.

यानुसार डी. बी. पथकाने कोलारा फाटा येथे सापळा रचून वाहनांची तपासणी सुरू केली. त्यावेळी विनाक्रमांकाची मोटारसायकल घेऊन येणाऱ्या संशयितास अडवून चौकशी करण्यात आली. वाहनाचे इंजिन वचेसिस क्रमांक तपासले असता ते चोरीस गेलेले वाहन असल्याचे स्पष्ट झाले. चौकशीत आरोपीने आपले नाव वसीमखान बब्बुखान (वय ३५), रा. पैनगंगा नगर, मेहकर असे सांगितले. विश्वासात घेऊन विचारपूस केली असता त्याने ४ जून रोजी चिखली बसस्थानकाजवळील देशी दारू गल्लीमधून मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी आरोपीला अटक करून चोरीची मोटारसायकल जप्त केली आहे.

# १९ वर्षीय युवती बेपत्ता

**खामगाव:** कॉम्प्युटर क्लासला गेल्यानंतर घरी परत न आल्याने १९ वर्षीय युवती बेपत्ता झाल्याची घटना नांदुरा येथे घडली आहे. नादुरा येथील एका १९ वर्षीय युवतीला १८ जून रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास तिच्या काकांनी नांदुरा येथील एका कॉम्प्युटर क्लासला सोडले होते. मात्र दुपारी साडेबारा वाजेपर्यंत युवती घरी परत न आल्याने कुटुंबीयांनी तिच्या मोबाईलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. परंतु मोबाईल बंद असल्याचे आढळून आले. त्यानंतर नातेवाईक, मैत्रिणी तसेच रेल्वे स्टेशन व बसस्थानक परिसरात शोध घेण्यात आला. मात्र ती अद्याप मिळून आलेली नाही. नांदुरा पोलिसांनी हरविल्याची नोंद घेतली आहे.

# मद्यधुंद टिप्पर चालकामुळे अपघात; एक जखमी

प्रतिनिधी २१ जून

**मलकापूर:** शहरातील शिवाजीनगर परिसरात दोन टिप्पर मध्ये झालेल्या अपघातात एक चालक जखमी झाला. दरम्यान, अपघातास कारणीभूत ठरलेला टिप्पर चालक मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवत असल्याचे वैद्यकीय तपासणीत निष्पन्न झाल्याने मलकापूर शहर पोलिसांनी त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

ही घटना १९ जून रोजी रात्री सुमारे १०.३० ते ११ वाजण्याच्या दरम्यान शिवाजीनगर येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळील रस्त्यावर घडली. मलकापूर शहर पोलिस ठाण्याचे पोलिस अंमलदार संतोष पेंढारकर आणि सहायक पोलिस उपनिरीक्षक सुरेश रोकडे हे गस्तीवर असताना त्यांना अपघाताची माहिती मिळाली. त्यानंतर त्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळी दोन टिप्परची समोरासमोर धडक झाल्याचे निदर्शनास आले. अपघातात एक चालक जखमी झाल्याने नागरिकांनी त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले होते. तर दुसऱ्या टिप्परच्या चालकाला नागरिकांनी पकडून ठेवले होते. चौकशीदरम्यान त्याने विजय हरी तायडे (वय ४०, रा. दाताळा, ता. मलकापूर) असे नाव सांगितले. त्याच्या हालचालींवरून तो मद्यधुंद अवस्थेत असल्याचा संशय पोलिसांना आला. त्यानंतर त्याला पोलिस ठाण्यात आणून उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय तपासणीसाठी पाठविण्यात आले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी केलेल्या तपासणीत विजय तायडे याने मद्यप्राशन केल्याचे स्पष्ट झाले. यानंतर मलकापूर शहर पोलिस ठाण्यात त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

# शेतात जाण्यास अडवून मारहाण व धमकी; चौघांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी २१ जून

**खामगाव:** शेतात जाण्यास विरोध करत शिवीगाळ, धक्काबुक्की तसेच खोट्या गुन्ह्यात अडकविण्याची व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी नांदुरा पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार मनोहर सारंगधर बोंबटकर (५५) रा. पिंपळगाव राजा, ता. खामगाव यांची गट क्रमांक ८२२ मधील शेती असून ते शेतात जाण्यासाठी सानपुडी गावातून ये-जा करतात. या मार्गावरून जाण्यास आरोपींकडून विरोध करण्यात येत असल्याचे तक्रारीत नमूद आहे. १८ जून रोजी सायंकाळी साडेचार वाजताच्या सुमारास वडनेर शिवारातील गट क्रमांक ८२२ येथे तक्रारदार शेतात असताना आरोपी तेथे आले. त्यांनी शिवीगाळ करत धक्काबुक्की केली. तसेच पुन्हा शेतात आल्यास खोट्या गुन्ह्यात अडकवून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. त्यावरून मधुकर इंगळे, रमेश किसन इंगळे, अशोक इंगळे आणि उमेश अशोक इंगळे (सर्व रा. सानपुडी, ता. नांदुरा) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ११५(२), ३५२, ३५१(२), ३५१(३) व ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल चिखलकर करीत आहेत.

# खामगाव तालुक्यातील ७३ ग्रामपंचायतींचे आरक्षण जाहीर!

## हरकती व सूचना दाखल करण्याचे आवाहन

प्रतिनिधी २१ जून

**खामगाव:** निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये खामगाव तालुक्यातील ७३ ग्रामपंचायतींसाठी ग्रामपंचायत सदस्य पदाच्या आरक्षणाची प्रारूप अधिसूचना संबंधित ग्रामपंचायतींमध्ये १९ जून रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या प्रारूप आरक्षणाबाबत कोणतीही हरकत किंवा सूचना असल्यास संबंधित नागरिकांनी २५ जूनपर्यंत कार्यालयीन वेळेत तहसील कार्यालय येथे लेखी स्वरूपात दाखल करावी, असे आवाहन तहसीलदार सुनील पाटील यांनी केले.

तालुक्यातील पिं. राजा, विहीगांव, सुटाळा खुर्द, टेंभुर्णा, निरोड, गोंधनापूर, वर्णा, ज्ञानगंगापूर, पळशी बु., पातोंडा, पाळा, पारखेड, अडगांव, सुटाळा बु., शेलोडी, शिर्ला नेमाने, हिवरखेड, भालेगांव, हिवरा खु. चितोडा, रामनगर, चिंचपूर, पिंप्री देशमुख, शहापूर, घाटपुरी, जनुना, पळशी खु., निपाणा, आवार, गवंढाळा, कंझारा, ढोरपगांव, कुंबेफळ, अंबिकापूर, उमरा अटाळी, गणेशपूर, लांजुड, बोथाकाजी, काळेगांव, पिंप्राळा, आंबेटाकळी, अंत्रज, पोरज, भंडारी, हिंगणा कारेगांव, कदमापूर, शिराळा, जळका भडंग, कंचनपुर, शिरजगांव दे., लाखनवाडा बु., वाडी, पिंप्री गवळी, आसा, गारडगांव, निमकवळा, घाणेगांव, कारेगांव बु., बोरी, पिंप्री कोरडे, खोलखेड, राहुड, टाकळी, संभापूर, लाखनवाडा खुर्द, मांडका, हिवरा बु., बोरजवळा, कोलोरी, निळेगांव, दधम, सुजातपूर, वाकुड अशा ७३ ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी ग्रामपंचायत सदस्य पदाचे आरक्षण सोडत प्रारुप अधिसुचना परिशिष्ट १० व नमुना ब अनुसूची संबंधीत ग्रामपंयतीमध्ये दिनांक १९-०६-२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

# बालविवाह प्रतिबंध अधिकारी व पोलिसांनी अंजनी बु. येथे बालविवाह रोखला

प्रतिनिधी २१ जून

**डोणगाव :** डोणगाव पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या अंजनी बुद्रुक येथे होणारा एका अल्पवयीन मुलीचा विवाह बालविवाह प्रतिबंध प्रशासन आणि पोलिस विभागाच्या संयुक्त कारवाईमुळे वेळेत रोखण्यात यश आले.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, १९ जून २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ४.५० वाजता डोणगाव पोलिस ठाण्यातील पोलिस अंमलदार गोविंद खंडागळे यांना डायल ११२ द्वारे गोपनीय माहिती प्राप्त झाली. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील अजंठा येथील अल्पवयीन मुलीचा विवाह अंजनी बु. येथील युवकासोबत होत असल्याची माहिती त्यात देण्यात आली होती. दरम्यान, चाइल्ड हेल्पलाइन बुलढाणाचे पर्यवेक्षक सागर नरवडे यांनीही प्रशासनाला याबाबत माहिती दिली.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन प्रशासनाने तातडीने कारवाईची सूत्रे हलवली. बालविवाह प्रतिबंधक अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, अंजनी बुद्रुक, योगेंद्र गुलाबराव बचाटे यांनी पोलीस कर्मचाऱ्यांसह विवाहस्थळी धाड टाकली. पडताळणीनंतर संबंधित मुलगी अल्पवयीन असल्याचे निदर्शनास आल्यानंतर विवाह सोहळा तात्काळ थांबविण्यात आला.

संबंधित मुलगी अल्पवयीन असल्याने तिच्या संरक्षणाची आवश्यकता लक्षात घेऊन तिला नातेवाईकांसह पुढील आदेशासाठी बालकल्याण समितीसमोर हजर करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. यासाठी पोलिस महिला कॉन्स्टेबल शालू गिन्हे यांच्या सोबत तिला बुलढाण्याकडे रवाना करण्यात आले. ही कारवाई डोणगाव पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी अमरनाथ नागरे, पोलिस कर्मचारी कुंडलिक वाळले, महिला पोलिस कॉन्स्टेबल शालू गिन्हे तसेच संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या पथकाने केली. बालविवाहासारख्या सामाजिक कुप्रथांविरोधात प्रशासनाने दाखविलेल्या तत्परतेमुळे परिसरात सकारात्मक संदेश गेला असून, अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी नागरिकांनीही संशयास्पद घटनांची माहिती तातडीने प्रशासनाला देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
रविवार, दि. २१ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

**२३ जूनला अकोल्यात आगमन**



# गजानन माऊलींचे पंढरीकडे 'महाप्रस्थान'





### वेदमंत्रोच्चारात रजत मुखवट्याचे पूजन

या ऐतिहासिक सोहळयाच्या प्रारंभी गजानन महाराज मंदिर परिसरात अनुपमेय श्रद्धा आणि हर्षोल्हास पाहावयास मिळाला. संस्थानचे विश्वस्त श्री निलकंठ पाटील यांच्या हस्ते श्रींच्या रजत मुखवट्याचे वेदमंत्रोच्चारात विधिवत पूजन-अर्चन करण्यात आले. त्यानंतर विठ्ठलभक्तीचा उत्साह अंतःकरणात घेऊन ७०० हून अधिक निष्ठावंत वारकरी हातामध्ये भगव्या पताका घेऊन पंढरीच्या वाटेने मार्गस्थ झाले. या नयनरम्य सोहळयाचे डोळे भरून दर्शन घेण्यासाठी भाविकांचा जनसागर उसळला होता.

### ३३ दिवसांचा खडतर पायी प्रवास आणि ब्रह्मानंद

मुखी अखंड हरीनाम आणि पाऊलांना वारीची ओढ असलेला हा सोहळा सुमारे ३३ दिवसांचा आणि १,१५० किलोमीटरचा पायी प्रवास पूर्ण करून आषाढ शुक्ल नवमीला पंढरपूर धाम येथे पोहोचेल. आषाढी एकादशीच्या महापूर्वावर सर्व वारकरी विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनाचा परम लाभ घेतील. वारीच्या मार्गावर ठिकठिकाणी माऊलींच्या पालखीचे भावपूर्ण स्वागत केले जाणार असून भजन, कीर्तन आणि प्रवचनांचे आयोजन करण्यात आले आहे.

## संतनगरीत भक्तीचा महापूर ! भक्तांचे पावसासाठी साकडे



प्रतिनिधी २१ जून

**शेगाव :** 'जय हरी विठ्ठल, श्री हरी विठ्ठल...' आणि 'ज्ञानोबा-तुकाराम' अशा विठ्ठल नामाच्या गगनभेदी जयघोषाने आज संपूर्ण संतनगरी शेगाव दुमदुमून गेली. आषाढी वारीच्या पावन पर्वावर, श्री संत गजानन महाराज संस्थानच्या परंपरेनुसार, श्रींच्या पालखीचे आज ज्येष्ठ शुक्ल सप्तमी तिथीला सकाळी ठीक ७ वाजता पंढरपूरकडे भावपूर्ण महाप्रस्थान झाले. टाळ-मृदंगाचा निनाद, शंखनाद आणि वारकऱ्यांच्या उत्स्फूर्त नृत्यामुळे संपूर्ण शेगाव नगरी भक्तिसागरात न्हाऊन निघाली होती. श्रींच्या प्रत्येक भक्ताने पावसाचे नियमित आगमनची अमुल्य मागणी मनोभावे केली. श्रींच्या पालखी सोहळ्याचे थेट प्रसारण आर आर सी नेटवर्कवर करण्यात येत आहे.





### राजराजेश्वर नगरीत २३ जूनला आगमन

अकोला जिल्ह्यातील भाविक आणि नागरिक श्रींच्या पालखीला सामोरे जाण्यासाठी अत्यंत उत्सुक आहेत. पालखीचा आगामी प्रवास आणि मुक्काम राहील. सोमवार२२ जून रोजी गायगाव येथे दुपारची विश्रांती आणि सायंकाळी ६ वाजता भौरद येथे रात्रीचा मुक्काम असेल. तर श्री संत गजानन महाराजांची पालखी अकोला शहरातील राजराजेश्वर नगरी परिसरात २३ व २४ एप्रिल या दोन दिवस मुक्कामी राहील. अकोल्यातील दोन दिवसांच्या मुक्कामात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, त्यानंतर श्री माऊलींची पालखी पंढरपूरच्या दिशेने पुढील प्रवासासाठी मार्गस्थ होईल.




## पातुर नगराध्यक्षपदी काँग्रेसचे इद्दू पहेलवान

प्रतिनिधी २१ जून

**पातुर :** पातुर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार हिदायतखा उर्फ इद्दू पैलवान यांनी विकास योद्धा मंचाचे उमेदवार सय्यद बुऱ्हाण यांचा पराभव करून दणदणीत विजय मिळविला. या चुरशीच्या लढतीत भाजपाचे सचिन ढोणे तिसऱ्या क्रमांकावर राहिले, तर शिवसेना (शिंदे गट) उमेदवाराची अनामत रक्कम जप्त झाली. २० जून रोजी झालेल्या मतदानानंतर रविवारी मतमोजणी पार पडली. नगराध्यक्षपदासह नगरपरिषदेच्या २० जागांसाठी झालेल्या निवडणुकीत काँग्रेसने ८ जागांवर विजय मिळवत आपले वर्चस्व सिद्ध केले. विकास योद्धा मंचालाही ८ जागा मिळाल्या असून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे २ आणि भाजपाचे २ नगरसेवक निवडून आले आहेत.



या निवडणुकीत शिवसेना (शिंदे गट) ला मोठा धक्का बसला असून नगराध्यक्षपदाच्या उमेदवारासह सर्व नगरसेवक उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली आहे. पातुर नगरपरिषदेची निवडणूक अत्यंत चुरशीची ठरली. निवडणुकीत काँग्रेस आणि शिवसेना (उबाठा) यांची युती होती, तर विकास योद्धा मंचासोबत राष्ट्रवादी काँग्रेस, एमआयएम आणि वंचित बहुजन आघाडीची आघाडी होती. निकाल जाहीर होताच पातुर शहरात काँग्रेस आणि शिवसेना (उबाठा) कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला. फटाक्यांची आतषबाजी, गुलालाची उधळण आणि विजयाच्या घोषणा देत कार्यकर्त्यांनी आनंदोत्सव साजरा केला. नगराध्यक्षपदी निवड झाल्यानंतर हिदायत खा उर्फ इद्दू पैलवान यांच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

काँग्रेसचे विजयी उमेदवार शितल प्रवीण पोहरे, मोहम्मद शाकीर मोहम्मद साबीर, सुनिता साहेबराव वाघमारे, साबा अहमद खान अझरखान, सुमया सदर शेख उस्मान ,मोहम्मद मेहता अब्दुल रहुफ ममता राजेश खोडे, हमीदाबी. विकास योद्धा मंचाचे डॉ. सय्यद वसीम, बुशरा अंजुम मोहम्मद बाबर, साजिया परवीन मोहम्मद कैसर, कंबर जमा खान आदिल खान, मोहम्मद फैज मोहम्मद मकसूद, शरबत जमीन सय्यद मुजाहिद इकबाल, सय्यद मुजम्मिल हुसेन, साहिस्ता फिरदोस मोहम्मद इरफान. शिवसेना उबाठाचे आनंदा रामभाऊ तायडे, अजय गजानन पाटील तर भाजपाचे अश्विनी सुनील पाटील, तुळसाबाई राजाराम गाडगे विजयी झाले.

## अकोट नप पोटनिवडणुकीत भाजपचा दोन्ही जागांवर विजय

वि प्रतिनिधी २१ जून

**अकोट :** अकोट नगर परिषदेत प्रभाग क्रमांक ४ अ व ४ ब साठी झालेल्या पोटनिवडणुकीत भारतीय जनता पक्षाने दोन्ही जागांवर विजय मिळवत आपले वर्चस्व कायम राखले. २० जून रोजी झालेल्या मतदानानंतर रविवारी मतमोजणी पार पडली. या निवडणुकीकडे स्थानिक राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले होते.

प्रभाग क्रमांक ४ ब (सर्वसाधारण महिला) मध्ये भाजपच्या शारदा योगेश नाठे यांनी १७०६ मते मिळवत दणदणीत विजय संपादन केला. शिवसेना (शिंदे गट)च्या भारती प्रशांत नाठे यांना ७८८ मते मिळाली असून त्या दुसऱ्या क्रमांकावर राहिल्या. तर वंचित बहुजन आघाडीच्या वर्षा देवेंद्र मोकोडे यांना ७२३ मते मिळाली. दरम्यान, प्रभाग क्रमांक ४ अ मध्ये भाजपचे उमेश सदाशिव हरसुलकर



यांनी १४०१ मते मिळवत विजय मिळविला. शिवसेना (शिंदे गट)च्या रेशमा चंदन चंडालिया यांना ८१९ मते मिळाली असून त्या दुसऱ्या क्रमांकावर राहिल्या. वंचित बहुजन आघाडीचे मंगेश उर्फ लखन प्रकाश इंगळे यांना ५०६ मते मिळाली. या निकालामुळे अकोट शहरातील स्थानिक राजकारणात भाजपची संघटनात्मक ताकद पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. दोन्ही प्रभागांमध्ये भाजप उमेदवारांनी प्रतिस्पर्ध्यांवर स्पष्ट आघाडी घेत विजय मिळवल्याने पक्ष कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला. विजयी उमेदवारांचे समर्थकांनी गुलाल उधळून व फटाक्यांची आतषबाजी करत आनंदोत्सव साजरा केला. या पोटनिवडणुकीच्या निकालामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अकोटमधील राजकीय समीकरणांना नवी दिशा




### श्री.संत गजानन महाराज पालखी सत्कार समिती, अकोला

# श्रींच्या अखंड सेवाभावाची 51 वर्षे

'सेवा हीच खरी पूजा... आणि भक्ती हीच जीवनाची दिशा...'या विचाराला आपल्या जीवनाचे ध्येय बनवून, गेली तब्बल ५१ वर्षे निस्वार्थ भावनेने, कुठल्याही प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता, श्रींच्या चरणी सेवा अर्पण करणारे एक कुटुंब म्हणजे – श्री संत गजानन महाराज शेगाव पालखी सत्कार समिती, अकोला. सन १९७६ मध्ये या समितीची स्थापना झाली. तेव्हापासून आजपर्यंत श्री संत गजानन महाराजांची पालखी अकोला नगरीत येते आणि त्याच प्रेमाने, त्याच भक्तिभावाने, त्याच सेवाव्रताने समितीचे कार्यकर्ते महाराजांच्या सेवेसाठी तन-मन धनाने अखंड सेवाभाव घेऊन सज्ज होतात.

पालखीचा मुक्काम शहरातील कुठल्याही ठिकाणी असो... वारकऱ्यांच्या सेवेसाठी समिती सदैव कार्यरत असते.कुठेही नाव नाही... प्रसिद्धी नाही... केवळ श्रींच्या चरणी समर्पित भाव आणि भक्तीची अखंड ज्योत! ही सेवा कोणत्याही देणगीवर किंवा पावतीवर चालत नाही. कारण ही सेवा पैशाने नव्हे, तर श्रद्धेने उभी राहिली आहे.



समितीचे प्रत्येक कार्यकर्ते स्वतःच्या कुटुंबाप्रमाणे तन, मन आणि धनाने या कार्यात सहभागी होतात. महाराजांच्या पालखीतील प्रत्येक वारकरी त्यांच्यासाठी विठ्ठलाचेच रूप असतो. म्हणूनच पालखी अकोल्यात येण्यापूर्वी प्रत्येक वारकऱ्याची माहिती घेऊन, त्याच्या मापानुसार पांढरा शुभ्र शर्ट, पायजमा, टोपी आणि दुपट्टा शिवून तयार ठेवला जातो.

**कारण ही केवळ वस्त्रांची भेट नसते...**
**ही असते प्रेमाची उब...**
**ही असते मायेची सावली...**
**ही असते भक्तांच्या हृदयातून**
**उमटलेली 'माहेरची भेट'!**

वारकरी जेव्हा प्रेमाने दिलेला हा पोशाख स्वीकारतो, तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर उमटणारे समाधान आणि आनंद पाहूनच समितीच्या कार्यकर्त्यांना आपल्या सेवाकार्याचे सार्थक झाल्याची अनुभूती मिळते. या सेवाकार्यात श्री संत गजानन महाराज संस्थान, शेगाव यांचे वेळोवेळी मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभत आले आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळे ही सेवा अधिक व्यापक आणि सुयोग्य पद्धतीने पार पडते.

श्री गजानन महाराजांचे भक्त आज जगभर पसरलेले आहेत.लाखो भक्तांना त्यांच्या कृपेचा प्रसाद लाभला आहे. त्याच कृपाछायेखाली प्रेरित होऊन, महाराजांच्या शिकवणीला जीवनात उतरवत, अकोल्यातील ही समिती मागील ५१ वर्षांपासून भक्ती, सेवा आणि समर्पणाचा दीप तेवत ठेवत आहे. आजच्या युगात निस्वार्थ सेवाभाव जिवंत ठेवणारे हे कार्य खरोखरच प्रेरणादायी आहे. समितीच्या प्रत्येक कार्यकर्त्याची खरी कमाई म्हणजे ना प्रसिद्धी, ना सन्मान...त्यांची खरी कमाई आहे —

महाराजांच्या चरणी लाभलेली सेवा... वारकऱ्यांच्या चेहऱ्यावरचे समाधान...आणि श्री गजानन महाराजांचा कृपाशीर्वाद!

**चला, आपणही या सेवाभावातून**
**प्रेरणा घेऊया...**
**भक्ती, सेवा आणि समर्पणाचा**
**हा वारसा पुढे नेऊया...**
**गण गण गणात बोते...'**
**संत गजानन महाराज की जय!**






हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012 /49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK